• पंढरपूर • गुरुवार, ३० जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २५०





अहिल्या पुलास समांतर नवीन पूल होणार - आ. समाधान आवताडे PII





मराठी भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वस्वी आपली- डॉ.खेडकर PIII


## १५ हून अधिक लोक दगावल्याची भीती; शाही स्नान रद्द

# कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**प्रयागराज :** प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्या दरम्यान, पहाटे १ वाजता चेंगराचेंगरीची घटना घडली. घाटावर अचानक मोठी गर्दी झाल्याने ही चेंगराचेंगरी झाली, असे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं आहे. यात १५ नागरिकांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, प्रशासनाने याला दुजोरा दिलेला नाही. अपघातात जखमी झालेल्या अनेकांना रुग्णवाहिकेतून दवाखान्यात नेण्यात आले आहे. घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात असून आखाडा परिषदेने अमृत स्नान पुढे ढकलले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी फोनवरून संपर्क साधून प्रयागराज येथील परिस्थितीतीचा आढावा घेतला तसेच तातडीने मदत कार्य राबवण्याचे आवाहन केले. प्रयागराजमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीनंतर गर्दी नियंत्रणासाठी आरएएफ तैनात करण्यात आले आहे.

प्रयागराज महाकुंभात मौनी अमावस्येनिमित्त संगम नोज येथे चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत काही भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मदत आणि बचावकार्य सुरू आहे. जखमींना महाकुंभातील मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेत किती जण जखमी झाले हे अद्याप समजू शकलेले नाही.

» पान ३ वर



### आखाड्यांचे शाही स्नान रद्द

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर आखाड्यांचे शाही स्नान रद्द करण्यात आले आहे. प्रशासनाने केलेल्या आवाहनानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. मौनी अमावास्येला सर्व आखाड्यातील साधू-संत शाही स्नान करत असतात. यावेळी भाविकांच्या सोयीसाठी आखाड्यांना पहाटे ४ वाजल्यापासून शाही स्नानासाठी निघावे लागले आणि ५ वाजेच्या आधीच स्नान सुरू करावे लागते.

" झालेली चेंगराचेंगरी लक्षात घेता शाही स्नान न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संपूर्ण मेळा परिसरात लाखो भाविक आले आहेत. या पार्श्वभूमीवर आजचे स्नान रद्द करण्यात यावे, असे आवाहन सर्वांना करण्यात आले आहे. आता आपण पुढच्या वसंत पंचमीला शाही स्नान करू. काल सायंकाळपर्यंत आम्ही या शाही स्नानाची योग्य व्यवस्था केली होती. मात्र, तरीसुद्धा मोठी गर्दी झाली, त्यामुळे चेंगराचेंगरी झाली. ज्याप्रमाणे प्रयागराजमध्ये गंगा, यमुना, सरस्वती यांचा संगम आहे, त्याचप्रमाणे या वेळी पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण यांचा संगम येथे होतो. सध्या संपूर्ण भारतातील नागरिक प्रयागराजमध्ये आले आहेत.

— रवींद्र पुरी


## At a Glance

### भाजप सदस्यता अभियानाद्वारे संघटना बळकट करा



**सांगोला :** भाजप सदस्यता अभियानांतर्गत भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जुन्या सदस्यांबरोबरच नवीन नागरिकांच्या घरोघरी भेटी देऊन तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व गावांत, चौकाचौकांतील नागरिकांना सदस्य करून अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी या सक्रिय सदस्यांमधूनच नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी होणार आहेत. भाजपच्या प्राथमिक सदस्य नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन एकत्रित काम करणार असल्याचे चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले.

### आज सोलापूर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन





**सोलापूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्ह्यातील नोकरी इच्छूक बेरोजगार उमेदवारांसाठी गुरूवार दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय (अल्पसंख्यांक विशेष) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, आ. टी. आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट अशा प्रकारची एकुण 1 हजार 374 पेक्षा जास्त रिक्तपदे 13 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

### सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू



**सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून 26 जानेवारी ते 9 फेब्रुवारी 2025 या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

### बोलेरोची ट्रॅक्टरला धडक; एकजण ठार





**पंढरपूर :** वाखरी ते वेळापूर रोडवरील थोरात पेट्रोल पंपासमोर रात्री साडेदहा वाजता भरधाव बोलेरो जीपची (एमएच ४५, एएल ५४८९) उसाच्या ट्रॅक्टरला मागून धडक बसली. सागर धनाजी कांबळे (वय २७, रा. लऊळ, ता. माढा) याने भरधाव वेगाने जीप चालवली व त्या अपघातात सौदागर नरहरी लोंढे (वय ५०, रा. मोडनिंब, ता. माढा) हे गंभीर जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला आहे.

## सांगोला वनविभागाकडून आणखी एक मोठी कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला, वनपाल सांगोला व वनरक्षक सांगोला यांनी सांगोला ते मिरज रोड येथे रात्रीची फिरती करत असताना दि.28.01.2025 रोजी सदरचा ट्रक क्र. MH 45 0180 विनापरवाना कडूलिंब जळावू लाकुड वाहतूक करत असताना जप्त केला.

सांगोला ते मिरज रोड येथे फिरती करत असताना दि.28.01.2025 रोजी रात्री 01.30 वा. फिरती करत असताना ट्रक क्र.MH 45 0180 मध्ये कडूलिंब जळावू लाकुड 22.638 घ.मी दिसुन आले. वाहन चालक यांचेकडे वनविभागाचा वृक्षतोड परवाना व वाहतूक पास परवाना नसल्याचे दिसुन आले. पंचनामा, जबाब, कागदपत्रे केली. जप्त लाकूड मालाचे अंदाजे 10 टन व किंमत अंदाजे 30,000/- होईल. 1) अनिल श्रीशेल बिराजदार रा. शिरठोन ता. चडचण जि. विजापूर (वाहन चालक) 2) राजु लक्ष्मण सोलकर रा. कात्राळ ता. मंगळवेढा जि. सोलापूर (ट्रक-मालक) 3) बिराप्पा लक्ष्मण सोनलकर रा. शिरठोन ता. चडचण जि. विजापूर (लाकुड-व्यापारी) 4) माळाप्पा लक्ष्मण माने रा. कात्राळ ता. मंगळवेढा जि. सोलापूर (शेतकरी) यांनी विनापरवाना वृक्षतोड व विनापरवाना वाहतूक केले बद्दल लाकुड मालासह वाहन जप्त केले. या चार व्यक्तीवर वनरक्षक सांगोला यांनी प्रथम वनगुन्हा क्र.ओ- 02/2025 दि.28.01.2025 यानुसार वनगुन्हा नोंद केला आहे. विनापरवाना वृक्षतोड करणे व विनापरवाना वाहतूक करणे आरोपी यांना वनगुन्हा मान्य आहे. त्यामुळे कारवाई केली. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला करित आहेत.

## कॅनरा रोबेको म्युच्युअल फंड यांच्यावतीने १२५ मुलींना सायकल वाटप - मा.आ.प्रशांत परिचारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील व तालुक्यातून दूर अंतरावरून चालत येणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना मोफत सायकलचे वाटप टिळक स्मारक मैदान येथे करण्यात आले आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यातील अनेक भागात आजही मुलींना त्यांच्या शिक्षणासाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. अनेक गावात पाचवी नंतरची किंवा दहावीनंतरची शिक्षण सुविधा नसल्यामुळे अनेक मुलींना परगावी जाऊन शिक्षण घ्यावे लागते, मात्र शाळेपर्यंत जाण्यासाठी मुलींना कुठलीही वाहतूक सुविधा नाही किंवा तुटपुंजा स्वरूपाच्या सुविधा आहेत. त्यामुळे अनेक मुलींचे शिक्षणही बंद केले जाते. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेक कुटुंबातील पालक आपल्या मुलींसाठी वाहतूक सुविधा किंवा सायकल खरेदी करू शकत नाहीत. त्यामुळे अनेक मुलींना शिक्षण सोडावे लागते त्यामुळे शाळेत मुलींची मोठी गळती होते. ही गळती थांबवण्यासाठी सरकारने मुलींना शाळेपर्यंत जाण्यासाठी मोफत सायकल अनुदान योजना सुरू केली आहे. त्यामुळे अनेक मुलींना शाळेत ये जा करण्यासाठी सायकल उपलब्ध होत आहेत. त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत असून शिक्षण घेण्यात मुलींची सक्षम संख्या ही वाढत आहे.

यावेळी बोलताना परिचारक म्हणाले की कॅनरा रोबेको म्युच्युअल फंड

» पान ३ वर





### जिल्ह्यातील १२२ गावांचा ड्रोन सर्व्हे बाकी

**सोलापूर :** जिल्ह्यातील भूमी अभिलेख अंतर्गत माहिती असलेल्या 755 गावांपैकी 633 गावांची केंद्र सरकारच्या स्वामित्व योजनेंतर्गत गावठाणची ड्रोनद्वारे परिपूर्ण तपासणी करून माहिती अद्ययावत केली आहे. अद्यापही जिल्ह्यातील 122 गावांच्या गावठाणची तपासणी करणे शिल्लक आहे. जिल्ह्याच्या 11 तालुक्यातील 755 गावांच्या गावठाणची तपासणीची मोहीम हाती घेण्यात आली होती. ड्रोनद्वारे गावातील गावठाणची तपासणी केली. संबंधित जागेच्या मालकाचे नाव, मोबाईल नंबर याची माहिती अद्ययावत केली आहे.

## महा कुंभमेळा पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीत हजारो भक्ताचे स्नान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** जेव्हा नव्हती गोदा गंगा तेव्हा होती चंद्रभागा अशी नोंद इतिहासामध्ये सापडते. सध्या उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे महाकुंभमेळा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मौनी अमावस्या निमित्त कोट्यावधी भक्तांनी महाकुंभमेळ्यात पवित्र स्नान केले. तर पंढरपूर येथील चंद्रभागा नदीमध्ये हजारो भक्तांनी पवित्र स्नान करून आनंद घेतला.

प्रयागराज येथे महाकुंभमेळा सुरू असल्यामुळे गंगा नदीत स्नान करण्यासाठी देशभरातून व प्रदेशातून कोट्यावधी भक्त दाखल झाले आहेत. मौनी अमावस्या निमित्त खास पवित्र स्नान असल्यामुळे कोट्यावधी भाविकांनी गंगा नदीमध्ये पवित्र स्नान केले. जेव्हा नव्हती गोदा गंगा तेंव्हा होती चंद्रभागा अशी नोंद इतिहासामध्ये आहे. यामुळे पंढरपूर येथील चंद्रभागा नदीस खूप महत्त्व आहे. महाकुंभमेळ्यासाठी प्रयागराज येथे जाऊ न शकलेल्या भक्तांनी आज बुधवारी मौनी अमावस्या निमित्य चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान केले. स्नानासाठी हजारो भाविकांची गर्दी झाली असल्याचे दिसून आले.

## नारळाचे दर पाच रुपयांनी वाढले; नागरिकांना आर्थिक फटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** भारतीय संस्कृतीमध्ये नारळाला खूप महत्त्व आहे. विविध धार्मिक कार्यक्रमात नारळाचा उपयोग केला जातो. यामुळे नारळास चांगली मागणी आहे. मात्र उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे महा कुंभमेळा असल्याने या ठिकाणी नारळाला चांगली मागणी असल्याने कोकण व गोवा येथून नारळ उत्तर प्रदेशला रवाना झाले आहेत. यामुळे महाराष्ट्रात नारळाची टंचाई भासू लागली असून दरात पाच रुपयांनी वाढ झाली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसला आहे. उत्तर प्रदेश येथील प्रयाग येथे महा कुंभमेळा भरला आहे. येथे गंगा नदीमध्ये स्नान करण्यासाठी व धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी कोट्यावधी भक्त दाखल झाले आहेत. यावेळेस गंगा नदीमध्ये नारळ अर्पण करण्यासाठी व विविध धार्मिक कार्यक्रमासाठी नारळाचा वापर



करण्यात येत आहे. यामुळे नारळाला चांगली मागणी असल्याने अनेक राज्यातून नारळ प्रयाग मध्ये पाठविण्यात आले आहेत. यामुळे महाराष्ट्रात नारळाची टंचाई भासू लागली आहे. आज बुधवारी मौनी अमावस्या असल्याने देवासमोर घरात व दुकानात नारळ फोडण्यासाठी नागरिक नारळ खरेदी करण्यासाठी गेले. तेंव्हा बाजारात नारळ पाच रुपयांनी वाढ झाली असल्याचे दिसून आले. 20 रुपयाचा नारळ 25 रुपये तर 25 रुपये नारळ 30 रुपये दराने विक्री होत होता. नारळाच्या दरात पाच रुपयाने वाढ झाली असल्याने नागरिकांना आर्थिक फटका सहन करावा लागला.

## शिंदे व ठाकरे दोघांचाही मला आशीर्वाद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** माझा १९९० ते २०२४ असा ३४ वर्ष राजकीय प्रवास शिवसेनेत शिवसैनिक म्हणून झाला आहे. यंदा मोहोळ मतदारसंघात मशाल व धनुष्यबाण ही नाही. यामुळे शिवसैनिक अस्वस्थ होते, परिणामी दोन्ही बाजूच्या शिवसैनिकांनी काहीही करून ही जागा आपल्याला काढायची असे निर्णय घेतला. मला महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे यांचेही मला आशीर्वाद होता. परंतु मी तुतारीचाच आहे. असे असे प्रतिपादन मोहोळचे राष्ट्रवादीचे आमदार राजू खरे यांनी केले आहे.

## गंगास्नान

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** पंढरपूरातील आढीव येथील एक सामान्य भक्त वाहनचालक दत्ता कामटे यांनी आज मौनी आमावस्याची पर्वणी साधून प्रयाग येथील गंगेत स्नान केले.

## विमा कंपन्यांची बनवाबनवी

# जिल्ह्यातील ३२ हजार शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे केले नाहीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शेतकरी शेतात पिकांची लागवड करतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. म्हणून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने एक रुपयात पिक विमा योजना सुरू केली आहे. मात्र पीक विमा कंपन्या बनवाबनवी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत असल्याचे उघड झाले आहे.


सोलापूर जिल्ह्यातील 32 हजार शेतकऱ्यांच्या शेतातील खरीप हंगामातील नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केले नाहीत. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल केल्या आहेत.



खरीप हंगामात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तूर, सोयाबीन, मूग, उडीद, कांदा अशा पिकांची लागवड केली होती. मात्र विविध कारणामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी पीक विमा भरला असल्यामुळे विमा कंपनीकडे नुकसान भरपाई मिळावी असा प्रस्ताव दाखल केला. यानंतर विभाग कंपनी पिकांची पाहणी करून नुकसान भरपाई देते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली आहे. मात्र 32 हजार शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे पंचनामे विमा कंपनीने केले नसल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे. म्हणून शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे तक्रार दाखल केली. याची दखल घेऊन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर येथे विमा कंपनी प्रतिनिधी व शेतकरी यांची बैठक घेण्याचे नियोजन केले आहे. या बैठकीत तोडगा निघण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. विमा कंपन्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे. याची गंभीर दखल जिल्हाधिकारी यांनी घेतली आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

## विखेंविरोधात उच्च न्यायालयात धाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** महसूलमंत्री असताना सोलापूर जिल्ह्यातील बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या ठेकेदारांना मदत केल्याची कबुली राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी टेंभुर्णी येथील कार्यक्रमात दिली होती. त्यामुळे विखे-पाटील यांची चौकशी करून त्यांना मंत्रिपदावरून दूर करावे, अशी मागणी मुंबई उच्च न्यायालयाकडे याचिकेद्वारे केल्याची माहिती शिवसेना ( ठाकरे गट ) उपनेते शरद कोळी यांनी दिली. याचिकेसोबत कोळी यांनी विखे-पाटील यांचे ठेकेदारांसंदर्भातील व्हिडिओही दिले आहेत. त्यामुळे विखे-पाटील यांच्या अडचणी वाढू शकतात.



## पालकमंत्री जयकुमार गोरे आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे आज गुरुवारी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे. गोरे यांचे सकाळी 8. 45 वाजता पुणे येथून विमानाने सोलापूरकडे प्रयाण, 9. 45 वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन व जिल्हा नियोजन समिती बैठकीस उपस्थिती. दुपारी 1 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून सोलापूर विमानतळकडे प्रयाण व दुपारी 1. 15 वाजता सोलापूर येथून विमानाने पुण्याकडे प्रयाण करतील.

**मंगळवेढा :** मंगळवेढा तालुक्यात शंभर रुपयांच्या स्टॅम्पचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी लाभार्थ्यांना चक्क 500 रुपयांचा स्टॅम्प विकत घ्यावा लागत आहे. तालुक्यात सध्या प्रधानमंत्री आवास योजना, घरगुती सोलर, वारसा नोंद, बँक प्रकरणासाठी शंभर रुपयांची आवश्यकता असते. सध्या या स्टॅम्पचा तुटवडा झाल्यामुळे लाभार्थ्यांना शंभर रुपये ऐवजी त्यांचे काम वेळेत व्हावे आणि दक्षिण भागातील सीमावर्ती भागातून तालुक्याला केलेला हेलपाटा वाया जावू नये म्हणून पाचशे रुपयांचा स्टॅम्प विकत घ्यावा लागत आहे.

### केंद्रीय सडक मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटींचा निधी मंजूर केला

# अहिल्या पुलास समांतर नवीन पूल होणार - आ. समाधान आवताडे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर आणि टेंभूर्णी मार्गावर भीमा नदीवर आणखी एक पूल होणार असून येथील अहिल्या पुलास समांतर अशा नवीन पुलासाठी केंद्रीय सडक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली. या पुलासाठी आ. आवताडे यांनी ना. गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या दरदिवशी वाढत आहे, मात्र भीमा नदीवर पंढरपूर जवळ सध्या एकच नवीन पूल आहे, आणि टेम्भूर्णी मार्गावर असलेला अहिल्या पूल ४५ वर्षे जुना आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरतो आहे. दरवर्षी भीमा नदीला पूर आला कि हा पूल पाण्याखाली जातो आणि वाहतूक ठप्प होते. शिवाय अहिल्या पूल जुना असल्याने त्यावरून वाहतूक करणे धोकादायक ठरते आहे. आजवर अनेक वाहने या पुलावरून भीमा नदीमध्ये पडलेली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्या पुलाजवळ आणखी एका समांतर पुलाची गरज होती. आणि आ. समाधान आवताडे यांनी या पुलाची मागणी केली होती. त्या नवीन पुलासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ७७.७१ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. एन एच ५६१ ए या टेम्भूर्णी - पंढरपूर - मंगळवेढा या मार्गावर हा पूल होणार असून सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ रोजी या पुलाच्या कामास ना. गडकरी यांनी मंजुरी दिली आहे. या पुलाच्या तांत्रिक मान्यतेनंतर २०२७ अखेर पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहर आणि मतदार संघातील विकासासाठी, जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेतला आहे. यामुळेच या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात काम करत असताना, विविध भागात अनेक प्रकारच्या विकास कामाचा निधी पोहोचविला आहे. त्याच धर्तीवर आणखी एक नव्याने पूल करण्याची मागणी केली असता. हा निधी मंजूर करून पंढरपूरकरासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे . आमदार समाधान आवताडे यांनी तरुणांच्या हाताला काम लवकरात लवकर मिळावे यासाठीही एमआयडीसीची लवकर निर्मिती होण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पंढरपूर शहरातील अनेक विकास कामामुळे आमदार समाधान आवताडे यांच्या कामाची मोठी ओळख निर्माण झाली आहे.

## जुगार अड्डयावर पोलिसांची धाड



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरातील रविवार पेठ येथील एका बंद घरात चालणाऱ्या जुगार अड्डयावर जेलरोड पोलिसांनी छापा टाकून 1 लाख 4 हजार 850 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई मंगळवारी दुपारी 12 वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या कारवाईत जितेंद्र सवदे, भगवान दूध्याल, अनवर आत्तार, सतीश राठोड, गणेश सरवदे, इरफान विजापूरे, आनंद पवार, अस्लम शेख, अतिक तुळजापूरे, श्रीशैल्य कलशेट्टी, सतीश ताटी, अखलाक पठाण, वाहिद जहागीरदार, बंदेनवाज कोरबू, जावेद विजापूरे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. हे सगळे अंदर - बाहर जुगार खेळत होते.

Selected

## जनता दरबारात नागरिकांच्या समस्या सोडवल्या



**बार्शी :** जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे बार्शी येथील तालुका जनता दरबार मधील तक्रारीची फेर आढावा बैठक पार पडली खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितत संपन्न झाली. तालुका स्तरावरील जनता दरबार मध्ये तक्रारी दाखल केलेल्या नागरिकांच्या तक्रारीची सोडवणूक केली. यावेळी खासदार ओमराजे यांनी अधिकाऱ्यांनाही धारेवर धरले.

## जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूने एकही पक्षी नाही बाधित



**सोलापूर :** जिल्हा परिषदेचा पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला असून जिल्ह्यातील एकाही पक्ष्याला बर्ड फ्ल्यूची बाधा झालेली नाही. मात्र, दक्षता म्हणून नागरिकांनी अंडी चांगल्या प्रकारे उकडून व चिकन शिजवून खावे. पक्षी पालकांनी (पोल्ट्री फार्म) पशुसंवर्धन विभागाच्या सूचनांचे पालन करावे, अशा सूचना राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रदीपकुमार देवरे यांनी दिल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे यांनी दिली. कोंबड्यांमध्ये या रोगाची लक्षणे आढळल्यास तत्काळ पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. नरळे यांनी केले आहे.

## केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मंजुरी मिळावी- आ.पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**करमाळा :** शेलगाव (वां) ता. करमाळा येथे केळी संशोधन केंद्र, ऊती संवर्धन – प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मंजुरी मिळावी अशी मागणी आमदार नारायण पाटील यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची मुंबई येथे भेट घेऊन केली आहे. यावेळी मंत्रीमोहदय यांनी तपासून मंजुरी देण्यात यावी असे संबंधितांना निर्देश दिले.

करमाळा तालुक्यामध्ये केळी पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. सोलापूर जिल्ह्यात केळी पिकासाठी असणारे पोषक वातावरण आणि मोठ्या प्रमाणात वाढत असलेले केळी पिकाखालील क्षेत्र याचा विचार करता करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र होणे गरजेचे आहे. करमाळा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात निर्यातक्षम केळीचे उत्पादन होऊन आखाती देशाबरोबरच युरोपीयन देशामध्येही केळीची निर्यात होत आहे. करमाळा तालुक्यामध्ये सन २०२१-२२ मध्ये ६७३१ हेक्टर व सन २०२२-२३ मध्ये ६९७८ हेक्टर व सन २०२३-२४ मध्ये ७३०० हेक्टर एवढ्या क्षेत्रावर केळी पिकाची लागवड केल्याचे कृषी विभागाकडे नमूद असून सरासरी उत्पादकता ६९ टन प्रति हेक्टर आहे. करमाळा तालुक्यामध्ये कोल्ड स्टोरेज व पॅक हाऊसची संख्या ०९ इतकी असून त्याची साठवण क्षमता २५००० मेट्रीक टन आहे. करमाळा तालुक्यातून मौजे कंदर, वाशिंबे, वरकटणे, जेऊर येथून ८००० कंटेनरमधून १,६०,००० मे. टन वजनाच्या केळीची निर्यात झालेली आहे. तसेच केळी फळावर प्रक्रिया करून वेफर्ससह इतर उत्पादन काढली जातात. परंतु केळी या पिकासाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याने कुशल मजुरासाठी प्रशिक्षण केंद्र, मृदा व जलपरीक्षण केंद्र, खत तपासणी प्रयोगशाळा, नवनवीन वाणाची निर्मिती व दर्जेदार रोपांची निर्मिती होण्यासाठी केळी संशोधन केंद्राची व ऊती संवर्धन प्रयोगशाळेची आवश्यकता आहे. तरी मौजे शेलगाव (वां) ता. करमाळा येथे केळी संशोधन केंद्र व ऊती संवर्धन प्रयोगशाळेची उभारण्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी कृषिमंत्री यांच्याकडे केली.

## कुष्ठरोग जनजागृती अभियान

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम कुष्ठरुग्ण शोध व उपचार अभियान दिनांक 31 जानेवारी ते 15 फेब्रुवारी 2025 सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीची सभा हे अभियान सोलापूर जिल्ह्यात राबविण्यासाठी घेण्यात आली. यावेळी जंगम यांनी कुष्ठरुग्ण शोध अभियान व स्पर्श, कुष्ठरोग जनजागृती अभियान प्रभाविपणे राबवा अशा सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिला.

## जनतेच्या ऋणात उतराई होणार



**अक्कलकोट :** अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून भाजपचे सचिन कलशेट्टी हे सलग दुसऱ्या वेळी निवडून आले आहेत. त्यामुळे तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे त्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. सलग दुसऱ्या वेळी विक्रमी मताधिक्याने निवडून आल्यामुळे जनतेच्या ऋणात उतराई होणार व विकासासाठी मोठे प्रकल्प योजना आणणारा असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कल्याण शेट्टी हे विश्वासू मानले जातात.

## कुर्डूवाडी उपविभागीय कार्यालयावर जप्तीची नामुष्की



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कुर्डूवाडी :** कर्डूवाडी येथील बाह्यवळण रस्त्यात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना सहा कोटींचा मोबदला जाहीर झाला होता. मात्र, तो अनेक वर्षांपासून मिळाला नाही. त्यामुळे माढा न्यायालयाने कुर्डूवाडी उपविभागीय कार्यालयातील फर्निचरसह वाहन जप्तीचे आदेश दिले. नामुष्की टाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी केलेली विनंती शेतकऱ्यांनी मान्य केल्याने तूर्तास जप्ती टळली. परंतु भविष्यात बाधित झालेल्या शेतकऱ्यांचा मोबदला दिला गेला नाही तर पुन्हा या कार्यालयावर जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

# अनैतिक संबंधातून महिलेचा खून; आरोपीस जन्मठेप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** आपल्या पत्नीचे चुलत भावासोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून मध्ये आलेल्या चुलत भावाच्या पत्नीची हत्या केली. गेल्या सहा वर्षापूर्वी झालेल्या या खून प्रकरणी माळशिरस अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधिश एल. डी. हुल्ली यांनी आरोपीस जन्मठेप व १ हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली.महादेव विष्णू थिटे (वय ५२, रा. बचेरी, ता. माळशिरस) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी माळशिरस पोलीस ठाण्यात २ ऑक्टोबर २०१८ रोजी सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आरोपी हा आपल्या पत्नीसोबत चुलत भावाचे अनैतिक संबंध असल्याचा संशय घेत होता. त्याच संशयातून तो १ ऑक्टोबर २०१८ च्या रात्री चुलत भाउ शहाजी थिटे यांच्या वस्तीवर गेला. वस्तीबाहेर शहाजी थिटे त्यांच्या पत्नी मंगल थिटे व मुलगा झोपी गेले होते. आरोपीच्या हातात कुर्हाड होती. शहाजीला संपवायचे याच हेतूने महादेव तिथे गेला होता. भिंतीच्या आडून झोपी गेलेल्या थिटे कुटुंबाकडे पहात असतानाच शहाजीथिटे यांची पत्नी मंगल या जाग्या झाल्या. त्यांना महादेव हातात कुर्हाड घेउन उभा राहिल्याचे दिसले. मंगल आरडाओरड करेल म्हणून आरोपी महादेव याने मंगल यांच्यावर कुर्हाडीने वार करून तिचा खून केला. मंगलची हत्या करून आरोपी तेथून पळून गेला. या प्रकरणी दत्तु शहाजी थिटे (वय २७, रा. थिटे वस्ती, बचेरी ता. माळशिरस) यांनी माळशिरस पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक विश्वभंर गोल्डे यांनी केला. सरकारी अभियोक्ता म्हणून एस. एस. पाटील यांनी काम पाहीले. कोर्ट पैरवी अधिकारी पोसई संजय कपडेकर, सपोफो पाडुळे व पोना. माने यांनी काम पाहिले.

## वैराग-मोहोळ रस्त्याची दुरवस्था; नागरिकांचा संताप



**माढा :** वैराग ते मोहोळ राज्यमार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे प्रवाशांसह वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येचा पाठपुरावा करत वैराग येथील रहिवासी ऋषिकेश राजेंद्र दिंडोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे लेखी अर्ज सादर केला आहे. वैराग ते मोहोळ राज्यमार्ग पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत होता. नंतर हा रस्ता महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यात वर्ग करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात केवळ थोड्याफार प्रमाणातच काम झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## अनधिकृत वाळूसाठे, वाहनांवर कारवाई सुरूच राहणार



**कुर्डूवाडी :** गुरुवारी पहाटे १२: ३० च्या दरम्यान वरवडे टोलनाक्याच्या नजीक टिप्पर पकडून वाळू चोरीबाबत संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. अनधिकृत वाळूसाठे व वाहतूक यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. महसूल प्रशासन व पोलिस प्रशासन सोबत असल्याने त्याला सामोरे जाऊ शकलो. यापुढेही कारवाया कायम राहतील, असे माढा विभाग कुर्डुवाडीच्या उपविभागीय अधिकारी प्रियांका आंबेकर यांनी सांगितले.



गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा
आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### सोलापूरात आढळले जीबीएस या आजाराचे पाच रुग्ण

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिला २ कोटीचा निधी; सोलापूरात जीबीएस आजाराचे उपचार मोफत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** राज्यात गुलियन बैरी सिंड्रोम म्हणजेच जीबीएस या दुर्मिळ आजाराने धुमाकूळ घातला आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यांमध्ये ३० जानेवारीपासून प्रत्येक घरा घरात सर्वे करण्यात येणार असून सोलापूर जिल्ह्यातील सर्व रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहे. यासाठी दोन कोटीच्या निधीची पूर्तता करण्यात आली आहे. जिल्ह्यातील कोणत्याही रुग्णांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. सध्या महाराष्ट्रात या आजाराचे तब्बल ७४ रुग्ण आढळले आहेत. यातील १४ रुग्णांवर व्हेंटिलेटरवर उपचार सुरु आहेत. तर पाच जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. यातील एका रुग्णाचा मृत्यू २६ जानेवारी रोजी उपचारादरम्यान सोलापूर येथे झाला आहे. सध्या सोलापुरात चार रुग्ण उपचार घेत आहेत. हे सर्व रुग्ण सोलापूर जिल्ह्याबाहेरील आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.याच पार्श्वभूमीवर सोलापूरचे जिल्हा प्रशासन सतर्क झाले असून पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तातडीने जिल्हा नियोजन समिती मधून दोन कोटीचा निधी आरोग्य यंत्रणेकडे सुपूर्द केला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सिव्हील हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी पत्रकार परिषद घेत सोलापूरकरांना या आजाराबाबत घाबरुन जाऊ नये असे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले, सोलापुरात या आजाराचे पूर्णपणे मोफत उपचार केले जाणार आहेत. या आजाराला घाबरू नये केवळ काळजी घेणे महत्त्वाचे आहे. हा आजार संसर्गजन्य नाही असे सांगत दूषित पाणी न पिता पाणी उकळून प्यावे, उघड्यावरचे व शिळे अन्न खाऊ नका, मांसाहारी पदार्थ आणि अंडी चांगल्या प्रकारे शिजवून खावीत असे आवाहन करण्यात आले. तसेच त्यांनी जीबीएस आजारावर उपचारासाठी आवश्यक औषधे ईमोग्लोबिन तसेच इंडक्शन स्टडी साठी आवश्यक मशनरी खरेदीसाठी जिल्हा नियोजन समितीमधून दोन कोटीचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आवश्यकता भासल्यास आणखीही निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. जीबीएस हा संसर्गजन्य आजार नसून नागरिकांनी घाबरून जाऊ नये या आजारात दूषित पेशी या नर्वस सिस्टीमवर अटॅक करतात. त्यामुळे रुग्णांना जुलाब आणि उलट्या झाल्याने पायाची शक्ती गेली तर ही त्याची लक्षणे आहेत तसेच सर्दी झाल्यानंतर हात पायातील शक्ती जाऊन घशात अन्न गिळताना त्रास होणे, दम लागणे, हातापायाला मुंग्या येणे हे या आजाराची लक्षणे आहेत. अशी लक्षणे असणाऱ्या व्यक्तीने डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय मेडिकल मधून औषधे घेऊ नयेत जीबीएस हा आजार साठ वर्षांवरील व्यक्तींना तसेच पाच वर्षांवरील वयोमानाच्या लोकांमध्ये प्रामुख्याने जाणवतो असे डॉ.वैशिपायन शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी सांगितले. जीबीएस रुग्णांकरिता सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ज्येष्ठांसाठी दहा तर लहान मुलांसाठी पाच व्हेंटिलेटर आरक्षित ठेवले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी स्वच्छ व बिसलरीचे पाणी प्यावे अथवा पाणी गरम करून ते प्यावे हा आजार १००% बरा होतो. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही असेही डॉ. ठाकूर यांनी सांगितले.

पंढरी संचार

**पंढरपूर :** भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याला ऊस तोडून पुरवठा करण्यासंदर्भात करारपत्र करून पाच जणांनी एक कोटी दोन लाख रुपये घेतले. त्यानंतर त्यांनी कराराप्रमाणे काहीच न करता फसवणूक केल्याची फिर्याद कारखान्याचे शेती अधिकारी प्रतापराव रंगराव थोरात यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसांत दिली.

### स्वेरीमध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' संपन्न

# मराठी भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वस्वी आपली-डॉ.खेडकर

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'मराठी आपली भाषा आहे. या भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वस्वी मराठी माणूस म्हणून आपली आहे. या भाषेला आता अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषेच्या अनुषंगाने सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा अनेक विषयात संशोधन घडून नवे विचार प्रवाह विकसित होत आहेत ज्यातून मराठी भाषा संवर्धनाला नक्कीच हातभार लागेल.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि मुंबई येथील डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, मुंबई यांच्या सूचनेनुसार 'मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार' करण्याकरीता दि.१४ ते दि.२८ जानेवारी २०२५ दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मातृभाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला. याच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.खेडकर मार्गदर्शन करत होते. प्रास्ताविकात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील म्हणाले की, 'मराठी मातीत आपण जन्मलो असल्यामुळे आपण मराठी भाषेतून संवाद साधला पाहिजे. आपण अभियांत्रिकीमध्ये शिक्षण घेत असलो तरी मराठी भाषेला विसरता कामा नये.' असे सांगून त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेचे महत्व स्पष्ट केले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'आपल्या भाषेवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर अवांतर वाचन करणे आवश्यक आहे. आपण मागच्या आठवड्यात शासनाच्या सूचनेनुसार 'वाचन सप्ताह' आयोजित केला होता. त्यातूनही आपल्याला शिकता आले. अवांतर वाचन करता आले. वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्व विकासात भर पडते. वाचनामुळे उत्सुकता आणि जागरूकता निर्माण होते. वाचनामुळे करिअर करण्यासाठी योग्य दिशा मिळते. यासाठी विद्यार्थ्यांनी 'मोबाईल, टीव्ही व तथाकथित मित्र' हे सर्व सोडून पुस्तकांशी मैत्री करावी. पुस्तके आपल्याला तारतात. वाचनामुळे पुढील आयुष्य देखील सुखकर होते.' असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना प्रमुख मार्गदर्शक डॉ. खेडकर म्हणाले की, 'भाषांतर करण्याचे सामर्थ्य निर्माण होणे आवश्यक आहे. अनेक विषय हाताळण्यात मराठी भाषा अधिक प्रगल्भ आहे,' असे सांगून त्यांनी 'तद्भव व तत्सम' शब्दांची व्याख्या स्पष्ट केली. डॉ.खेडकर यांनी आपल्या भाषणातून, संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, नामवंत लेखक यांची अनेक उदाहरणे देऊन मराठी भाषा संवर्धन करणे गरजेचे आहे.' हे स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी स्वेरीचे विद्यार्थी तसेच ग्रंथपाल प्रा. सतीश बागल, अमोल रोंगे, सतीश अनपट, सुधीर मोरे, दत्तात्रय आसबे आदी उपस्थित होते. प्रा.सुजित इनामदार यांनी सूत्रसंचालन केले तर डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्रा.अमेय भातलवंडे यांनी आभार मानले.

## आग लावून दाम्पत्याला ठार मारण्याची धमकी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** कोर्टातील केस माघारी काढून घे म्हणत पती-पत्नीला मारहाण करत माझ्याकडे बंदूक आहे, गोळ्या घालून मारण्याची धमकी देऊन गळ्यातील २५ ग्रॅम सोन्याचे गंठण तोडून घेतल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्याचबरोबर त्यांच्या शेतातील विविध पिकांना आग लावून १ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत शकिला अ. हफीज शेख (रा. शिवाजीनगर, मोदी खाना, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत. शकिला अ. हफीज शेख यांनी आपल्या कुटुंबावर झालेल्या अन्यायाविरुद्ध कोर्टात केस घातली आहे. त्यामुळे आरोपी यांनी चिडून जाऊन त्यांच्या शेतातील पिकास आग लावून नुकसान केले आहे.

» पान १ वरुन

## कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी!

दरम्यान, मध्यवर्ती रुग्णालयाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पहाटे साडेतीन वाजल्यापासून २२ रुग्णवाहिका मध्यवर्ती रुग्णालयात दाखल झाल्या आहेत. आखाड्याला पाच वाजल्यापासून संगम नाका येथे स्नान करायचे होते, मात्र अद्याप त्यांना आखाडा मार्गात प्रवेश करता आलेला नाही. आखाडा मार्गावर दर १०-५ मिनिटांनी रुग्णवाहिकेच्या सायरनचे आवाज ऐकू येत होते.प्रत्यक्षदर्शींनी व कर्नाटकातील बेळगाव येथील असलेल्या सरोजिनी या महिलेने सांगितले की, संगम नाकावर अचानक गर्दी झाली आणि खांब कोसळला आणि चेंगराचेंगरी झाली.

या घटनेत काही वृद्ध व्यक्ती व नागरिक जखमी झाले.गोंडायेथील दर्जी कुआं येथील रहिवासी जोखू लाल यांनी सांगितले की, चेंगराचेंगरीत त्यांचे काका नानकन (वय ४४) यांचा मृत्यू झाला.

मृतदेह घेण्यासाठी ते मध्यवर्ती रुग्णालयात आले आहेत. बलियातील नागरा येथील रहिवासी बलजीत सिंग यांनी सांगितले की, अचानक मोठी गर्दी वाढली व चेंगराचंगरे झाली. यात त्यांच्यासोबत आलेले लोक जखमी झाले. बिहारमधील सासाराम बिहार साजन डेरा येथील रहिवासी श्याम नारायण हे त्यांची पत्नी व घरातील ७ जणांसोबत आले होते. त्यांचा दीड वर्षाचा नातू चेंगराचेंगरीत खाली पडल्याने तो जखमी झाला आहे. त्यांच्यावर मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## कॅनरा रोबेको म्युच्युअल फंड....

यांच्या वतीने हा अत्यंत उपयुक्त उपक्रम राबविण्यात आला आहे. पंढरपूर शहर व तालुक्यात एकूण 125 विद्यार्थिनींना सदर सायकलचे वाटप माझ्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वेळेची बचत होऊन त्यांचे आरोग्यही सुदृढ राहावे, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी सायलकचा योग्य वापर करून प्रगती साधावी असे आवाहन मा.प्रशांत परिचारक यांनी केले आहे.

तसेच मुलीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांचा सामाजिक विकास करण्यासाठी सरकारच्या वतीने विविध योजना राबवल्या जातात. या योजनेच्या माध्यमातून मुलींच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा होत आहेत. सायकल मिळाल्यानंतर मुलींच्या चेहऱ्यावरील आनंदाला पारावार उरला नव्हता. तर मुलींच्या पालकांनी सायकली मिळाल्यानंतर मुलींना वेळेवर शाळेत ये-जा करता येईल, आणि अधिकचा वेळ अभ्यासाला मिळेल व शिक्षण पुर्ण होईल अशी आशा व्यक्त केली.

यावेळी कॅनरा रोबेको म्युच्युअल फंडचे रिझनल हेड मा.कुलदिल थोरगुले, मयूर परिचारक, लक्ष्मण शिरसट, गणेश अधटराव, सतीश मुळे, सुभाष मस्के, विक्रम शिरसट, अमोल डोके, अ‍ॅड.इंद्रजित परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, इब्राहिम बोहरी, सुजितकुमार सर्वगोड, नवनाथ रानगट, नारायण शिंगण, संगिता पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष व सदस्य, लाभार्थी विद्यार्थी व पालक, शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस.टी बससेवा सुरु!

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** माढा तालुक्यातील उजनी गावाला एस.टी.बस सेवा काही दिवसापूर्वी ग्रामस्थांनी बस सेवा बंद आहे म्हणून आ.अभिजीत पाटील यांना सांगितले असता त्यावर कुर्डूवाडी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना बोलून काम मार्गी लावले. बस सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिक, माता भगिनीं यांच्यातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या श्रींच्या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** दि. 02 ते 12 फेब्रुवारी दरम्यान माघ वारी संपन्न होत असून, दि.8 फेब्रुवारी रोजी यात्रेचा मुख्य विषय आहे. या यात्रेला येणा-या भाविकांना कार्तिकी यात्रेप्रमाणे सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच माघ शुध्द 5 म्हणजे दि.2 फेब्रुवारी रोजी परंपरेनुसार श्रींचा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. त्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. तसेच स्थानिक नागरिकांच्या दर्शन व्यवस्थेमध्ये वेळ वाढविण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. माघवारी पुर्व नियोजनाबाबत आज श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर येथे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली . बैठकीस मंदिर समितीचे सदस्य डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, भागवतभुषण अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्व खात्याचे सहायक संचालक डॉ.विलास वाहणे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन व संवर्धन कामाचे ठेकेदार रमेश येवले तसेच मंदिर समितीचे विविध खात्याचे विभाग प्रमुख उपस्थित होते.


» Selected


## बेवारस मयताबाबत संपर्क साधण्याचे आवाहन



**पंढरपूर :** उपविभागीय पोलीस अधिकारी , कार्यालयाच्या समोरील रेल्वे रुळावरती एक अनोळखी महिला रेल्वे गाडी सापडून जागीच मयत झाली आहे. सदर मयत महिलेबाबत माहिती असल्यास सबंधितांनी रेल्वे पोलीसांशी संपर्क साधवा असे, आवाहन पंढरपूर रेल्वे पोलीसांनी केले आहे . अनोळखी मयत महिलेचे वय अंदाजे 42 वर्षे असून , उंची 5 फुट 6 इंच, रंग गोरा, केस काळे, चेहरा गोल, नाक सरळ, अंगावर पिवळ्या रंगाची साडी, लाल रंगाचा ब्लाऊज, निळ्या रंगाचा परकर असे मयत महिलेचे वर्णन आहे. संबधीतांनी तसेच ओळखीच्या व्यक्तीने याबाबत पंढरपूर लोहमार्ग पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे .

## आढीव तपोवन येथे पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवाचे भव्य आयोजन





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील डॉ.शितल के शहा यांचे फार्म हाऊस तपोवन येथे श्री 1008 मुनिसुव्रतनाथ भगवान यांच्या पंचकल्याणक महोत्सवात महोत्सव दिनांक 1 फेब्रुवारी ते दिनांक 5 फेब्रुवारी या कालावधीमध्ये करण्यात येत आहे तशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक पंढरपूर येथील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. शितल के शहा यांनी दिली. या धार्मिक कार्यक्रमास पंढरपूर पंचक्रोशीतील एक ते दीड हजार श्रावक श्राविका दररोज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात चर्याशिरोमणी जैनाचार्य दिगंबराचार्य श्री 108 विशुद्ध सागर जी महाराज ससंघ यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पंचकल्याणक महोत्सव सोहळा चे भव्य आयोजन होत आहे तरी या कार्यक्रमांमध्ये गर्भ कल्याणक, जन्मकल्याणक, तपकल्याणक, ज्ञानकल्याणक ,मोक्ष कल्याणक, तसेच प्रवचन, स्वाध्याय पूजा, उपनयन, संस्कार या ठिकाणी होणार आहे तरी पंढरपूर व परिसरातील सर्व जैन श्रावक श्राविकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. शितल के. शहा यांनी केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा गादेगाव येथे उद्‌घाटन समारंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** उमा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे 'युथ फॉर माय भारत व डिजिटल साक्षरतेसाठी युवक'हे ब्रीद वाक्य घेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व उमा महाविद्यालय पंढरपूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ जानेवारी २०२५ ते ०३ फेब्रुवारी २०२५या कालावधीत संपन्न होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे गादेगाव येथे उद्‌घाटन संस्थेचे विश्वस्त युवा नेते प्रणवजी परिचारक, गादेगाव सरपंच सीमाताई बालाजी बागल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी युवा नेते प्रणव परिचारक यांनी " राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून व लोकसहभागातून करण्यात येणाऱ्या ग्रामस्वच्छतेमुळे स्वच्छतेचे महत्व समजून ग्रामीण व शहरी भाग स्वच्छ होऊन 'स्वच्छ भारत सुंदर भारत' निर्माण होणार आहे. याबरोबरच रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती बांधलकी निर्माण होते. असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी रा.से. यो.स्वयंसेवक विद्यार्थ्यांना या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून. भरीव कामे केली जातात. यामुळे स्वयंसेवक विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व कळते. स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. यामध्ये समाजाचा मोठा वाटा असतो. म्हणूनच ग्रामस्थांचाही सहभाग असावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाप्रसंगी ग्रामस्थांच्या वतीने शिवाजी शिंदे,आनिल बागल यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.सिंधू खिलारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कावरे व्ही एन यांनी केले. उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. लोखंडे एन एस यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, रा.से.यो.स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## जीबीएस रुग्णांची माहिती आरोग्य यंत्रणेला द्या



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालयांकडे गुईलेन बॅरे सिंड्रोम आजाराचा रुग्ण आढळल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ संबंधित शासकीय आरोग्य यंत्रणेने घेऊन त्याचा दैनंदिन अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जीबीएस आजाराच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार आदी अधिकारी उपस्थित होते.




### विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाबरोबर

# एखादी कला आत्मसात करावी जीवन आनंदमय बनेल- दुधाणे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर आयोजित करण्यात आलेल्या सप्तरंग सांस्कृतिक उत्सवात स्वरयात्रा व चित्रकला आणि पुरातन वस्तू प्रदर्शन प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आला असताना पुणे शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे साहेब बोलत होते. सुरुवातीला रावसाहेब मिरगणे साहेब सचिव सुधीर पटवर्धन.प्रमुख अभ्यागत भारत गदगे.असावरी पटवर्धन.वि.दा.सवाई ज्ञानेश्वर दुधाणे डॉ मिलिंद जोशी.मा.मुख्याध्यापक एस पी कुलकर्णी मुख्याध्यापक पाटील सर उपमुख्याध्यापक एम आर मुंढे.व्ही एम कुलकर्णी.रुपनर सर.यांच्या प्रमुख उपस्थितीत चित्रकला आणि पुरातन वस्तू प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले.विद्यार्थी विद्यार्थ्यांनींनी अतिशय सुंदर चित्र काढून पूरातन वस्तुंचे प्रदर्शन पाहून भुतकाळात गेल्याची जाणीव झाली.त्यानंतर वाद्यांचे पूजन करत प्रमुख मान्यवरांच्या सत्कारानंतर मुख्य स्वरयात्रा कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी भारत गदगे सरांनी काढलेले अप्रतिम सरस्वती देवीचे स्केच शाळेला भेट दिले.पंचम विद्यालयाचे संगीत शिक्षक वैभव केंगार यांच्या मार्गदर्शनाखाली अप्रतिम स्वरयात्रा समूहगीत बसवली होती त्यामध्ये २००० विद्यार्थी विद्यार्थिनी एका सुरात मायभूमी तू उधळीत शत किरणा अनादी मी अनंत मी. अतिशय सुंदर गीत सादर करत वाहवा मिळवली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत रोहन पंढरपूरकर, अविनाश इनामदार, करण भोसले, सिद्धार्थ दणाणे,ओंकार माने यांनी दिली. त्यानंतर मिरगणे साहेब यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की या लहान वयातच मुलांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला पाहिजे.मराठी शाळा टिकवण्यासाठी कवठेकर प्रशाला अतिशय कष्ट घेत आहे सांगून ज्ञानेश्वर दुधाणे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की आयुष्य सुखकर समाधानी करायचं असेल तर पुस्तकी ज्ञानाबरोबर एखादी कला असणे गरजेची असून ज्ञान जीवन जगायला शिकवते कला जीवन कसं जगायचं ते शिकवते आठवणी सांगत पखवाज वादनातील काही परत सादर करत विद्यार्थ्यांना आनंदी केलं.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील सर यांनी ७८ वर्षाच्या कवठेकर प्रशालेची यशस्वी परंपरा इतिहास सांगत संस्थेचा प्रगती अहवाल सादर केला.सुंदर सुत्रसंचलन आकांक्षा बिराजदार मॅडम यांनी करत आभार पर्यवेक्षिका एस.आर. कुलकर्णी यांनी मानले. यावेळी स्वरयात्रा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कवठेकर प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षिका आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरी संचार

संपादकीय विशेष

# राम पावला!

प्रजासत्ताक दिनी केंद्र सरकारने २०२५ साठीच्या पद्म पुरस्कारांची घोषणा केली. ज्या व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे आणि समाजासाठी असाधारण सेवा केली आहे, अशा व्यक्तींना भारत सरकारकडून हे पुरस्कार दिले जातात. या वर्षी पद्म पुरस्कारांच्या यादीत एकूण १३९ नावांचा समावेश करण्यात आला असून, यापैकी अनेकांनी शिक्षण, साहित्य, विज्ञान, कला, क्रीडा आणि सामाजिक कार्यात आपला ठसा उमटवला आहे. पद्म पुरस्कारांची ही यादी केवळ त्यांच्या कार्याद्वारे समाजावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींनाच ओळखत नाही, तर भारतीय समाजाच्या विविध पैलूंमध्ये योगदान दिलेल्या व्यक्तींनाही सन्मानित करते. या वर्षी विशेषत: शैक्षणिक, साहित्य, कला, चित्रपट, वैद्यक आदी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अनेक व्यक्तींचा गौरव करण्यात आला आहे. परदेशात राहून योगप्रसाराचे काम करणाऱ्यांची ही दखल घेण्यात आली. हे पुरस्कार म्हणजे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरलेल्या त्यांच्या बहुमोल कार्याची दखल आणि कौतुक आहे. यंदा पद्म पुरस्कारांमध्ये विशेष स्थान मिळालेले ३७ जण शिक्षण, साहित्य आणि विज्ञान क्षेत्राशी संबंधित आहेत. आपल्या कठोर परिश्रमाने आणि समर्पणाने, या व्यक्तींनी या क्षेत्रात आपले केवळ महत्त्वपूर्ण योगादन दिले नाही, तर इतरांनाही प्रेरणा दिली आहे. यापैकी काही प्रमुख नावे आहेत, ज्यांनी शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात भरीव कार्य केले आहे आणि समाजात शिक्षणाचे महत्त्व आणि जागरूकता वाढविली आहे. राष्ट्रपतींनी एकूण १३९ जणांची यादी जाहीर केली असून त्यामध्ये सात दिग्गजांना पद्म विभूषण, १९ दिग्गजांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर केला आहे, तर ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. दरम्यान, या १३९ दिग्गजांच्या यादीत महाराष्ट्रातील १४ जणांचा समावेश आहे. देशात सर्वाधिक पुरस्कार मिळालेल्यांत महाराष्ट्रीय व्यक्ती आहेत. महाराष्ट्रातील तीन दिग्गजांना पद्मभूषण व ११ दिग्गजांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कारामध्ये महाराष्ट्रातील मारूती चित्तमपल्ली, होमिओपॅथी चिकित्सक डॉ. विलास डांगरे यांचा समावेश आहे. तसेच शैली होळकर, डॉ.नीरजा भाटला, भीमसिंह भावेश, थविल वादक पी.दत्चनमूर्ती, शेखा एजे अल सबा, एल हँगथिंग, भैरूसिंग चौहान, जगदीश जोशीला, सेनानी लिबिया लोबो सरदेसाई, हरविंदर सिंग यांना देखील पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. डांगरे हे होमिओपॅथिक डॉक्टर आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवा देत आहेत. त्यांनी आतापर्यंत जवळपास एक लाखांपेक्षा जास्त रुग्णांवर उपचार केले आहेत. ते गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांवर उपचार करतात. चितमपल्ली यांनाही पद्मश्री जाहीर झाला आहे. ते ज्येष्ठ साहित्यिक आहेत. त्याचबरोबर, चैतराम पवार यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. ते वन आणि वन्यजीवाच्या संवर्धनासाठी काम करतात. गेल्या वर्षी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. या वर्षी त्यांना पद्मश्री मिळाला. मामांचा गौरव हा तमाम मराठी कलावंतांचा गौरव झाल्यासारखे आहे.

काही मोठ्या व्यक्तींना पुरस्कार देताना त्यात काही जवळच्या व्यक्तींना नागरी सन्मान दिला जातो. त्यावरून मग टीका होते. राजकीय कर्तृत्व मोठे असले, म्हणजे ते नागरी सन्मानाला पात्र ठरतात, असे नाही. समाजसेवा आणि अध्यात्म, समाजसेवा आणि राजकारण यांची सांगड घातली जाते. राजकीय सोईसाठी काही नागरी सन्मान दिले जातात. अन्य मोठ्या व्यक्तींच्या सावलीखाली असे पुरस्कार झाकले जातील, अशी अपेक्षा असते; परंतु दरवेळी तसेच होते असे नाही. पद्मविभूषण अपवादात्मक आणि विशिष्ट सेवेसाठी दिला जातो. उच्च दर्जाच्या विशिष्ट सेवेसाठी पद्मभूषण आणि विशिष्ट सेवेसाठी पद्मश्री पुरस्कार दिला जातो. भारत सरकारच्या म्हणण्यानुसार हे पुरस्कार देण्यामागचा उद्देश काही विशेष कार्याला मान्यता देणे हा आहे. कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, वैद्यक, समाजसेवा, विज्ञान, नागरी सेवा, व्यवसाय यासह अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. सरकारच्या मते, निवडलेल्या व्यक्तीच्या कामगिरीमध्ये लोकसेवेचा घटक असायला हवा. आताच्या यादीवर नजर टाकली, तर वर दिलेल्या निकषांत अनेकजण बसत नाहीत; परंतु उपकृततेच्या भावनेने त्यांना नागरी सन्मान जाहीर झाला असावा, असे मानण्यास जागा आहे. भारत सरकारच्या मते, पद्म पुरस्कार हे शीर्षक नाही आणि निमंत्रण पत्रिका, पोस्टर्स, पुस्तकांवर पुरस्कार विजेत्याच्या नावापुढे किंवा मागे पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री लिहिता येत नाही. पुरस्कार विजेत्यांना रेल्वे किंवा विमान प्रवासात कोणताही रोख भत्ता आणि सवलत मिळत नाही. या वर्षी पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांमध्ये साध्वी ऋतंभरा यांचेही नाव आहे. सामाजिक कार्यासाठी त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना हा सन्मान मिळाल्यानंतर 'सोशल मीडिया'वर याबाबत चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे सरकारवर पद्म पुरस्कारांचे राजकारण केल्याचा आरोप होत आहे, तर दुसरीकडे काही लोक या निर्णयाचे स्वागतही करत आहेत. पद्मभूषण पुरस्कार मिळाल्यावर साध्वी ऋतंभरा म्हणाल्या, की मला सर्वात मोठा पुरस्कार तेव्हाच मिळाला, जेव्हा राम मंदिरात २२ जानेवारी २०२४ रोजी राम लल्ला विराजमान झाले. राम मंदिर आंदोलनाशी निगडीत चेहऱ्याला भारताचा नागरी पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ नाही. राम मंदिर आंदोलनासंदर्भात देशभरात रथयात्रा काढणारे भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना गेल्या वर्षी 'भारतरत्न' या देशातील सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या चळवळीतील भाजपचा दुसरा प्रमुख चेहरा, मुरली मनोहर जोशी यांना २०१७ मध्ये देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण प्रदान करण्यात आला. साध्वी ऋतंभरा व्यतिरिक्त राम मंदिराशी संबंधित आणखी दोन लोकांना या वेळी पद्म पुरस्कार देण्यात आला आहे. यापैकी राम मंदिराच्या अभिषेकासाठी मुहूर्त ठरवणारे वैदिक पंडित गणेशवर शास्त्री द्रविड यांना साहित्यासाठी पद्मश्री देण्यात आला आहे. राम मंदिराचे मुख्य वास्तुविशारद चंद्रकांत सोमपुरा यांना आर्किटेक्चरच्या श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अयोध्या वादाच्या वेळी विशेष कर्तव्य बजावणारे माजी आयपीएस अधिकारी कुणाल किशोर यांना मरणोत्तर पद्मश्री जाहीर करण्यात आली आहे.

न्यायव्यवस्थेतील योगदानाबद्दल भारताचे माजी सरन्यायाधीश जे. एस. खेहर यांची पद्मविभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. अयोध्या वादात त्यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ज्येष्ठ वकील सी. एस. वैद्यनाथन हे अयोध्या वादात भगवान राम यांच्या वतीने वकील होते, त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अनेक पुरस्कारावरून वादळ उठले आहे तरी राम मंदिर आंदोलनातील अनेकांना आता राम पुरस्काराने पावला आहे.

# आता संधी 'चॅम्पियन ट्रॉफी' ची

**जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला. त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. चॅम्पियन ट्रॉफिसाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून निवड समितीचे अभिनंदन. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०१३ नंतर भारताला चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरण्यात अपयश आले, हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी संघाला आहे.**

प्रासंगिक
श्याम ठाणेदार
पुणे

पुढील महिन्यात १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत पाकिस्तान आणि दुबई येथे एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर व कर्णधार रोहित शर्मा यांनी यांनी १८ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. विशेष म्हणजे हे दोघे या संघाचे कर्णधार आणि उपकर्णधार आहेत यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वाल ची निवड करण्यात आलेली आहे. मधल्या फळीची जबाबदारी अनुभवी विराट कोहली, श्रेयस अय्यर, के एल राहुल तसेच यष्टीरक्षक ऋषभ पंत यांच्यावर टाकण्यात आली आहे अनुभवी के एल राहुल हा अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडेल.



विशेष म्हणजे दोघेही उत्तम फिनिशर म्हणून आपली जबाबदारी पार पाडतात. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून रोहित, शुभमन व विराट हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. एकदिवसीय सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही एकदिवसीय सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात तसेच मागील वर्षी वेस्ट इंडिज मध्ये झालेल्या टी २० विश्वचषकात तिघांनीही चांगली कामगिरी केली आहे. या तिघांची कसोटीतील कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली नाही त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली असली तरी मर्यादित षटकांच्या सामन्यात त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे. सध्या जरी ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसतील तरी ते या स्पर्धेत पुन्हा आपल्या पूर्वीच्या फॉर्ममध्ये येऊ शकतात ते जर पुन्हा फॉर्मात आले तर चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याच्या भारताच्या आशा पल्लवित होतील.

चौथ्या क्रमांकावर युवा श्रेयस अय्यर येईल. भारताचा तो भरवशाचा फलंदाज असून एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने पाचशे पेक्षा अधिक धावा काढल्या आहेत. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा के एल राहुल घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर ऋषभ पंत हा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. वॉशिंग्टन सुंदर हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. ऑफस्पिन गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी रवींद्र जडेजा सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि लेफ्ट आर्म स्पिनर अक्षर पटेल यांना संधी मिळाली आहे. तिघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत त्यामुळे मंदगती गोलंदाजीत विविधता नसल्याची टीका टीकाकार करीत असले तरी तिघेही फॉर्ममध्ये आहे. जडेजा हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. कुलदीप यादव जरी डावखुरा असला तरी तो चायनामन गोलंदाज आहे आणि विशेष म्हणजे तो फॉर्ममध्ये आहे. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला संधी देणे केंव्हाही चांगले. अक्षर पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करू शकतो त्याची फलंदाजी भारतासाठी बोनस ठरेल. जसप्रीत बुमराह व मोहम्मद शामी या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत अर्शदिप सिंग या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे.






मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. चॅम्पियन ट्रॉफिसाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०१३ नंतर भारताला चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरण्यात अपयश आले आहे. हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी या निमित्ताने या संघाला मिळणार आहे. १९९८ साली सुरू झालेली ही स्पर्धा भारताने २००२ आणि २०१३ साली जिंकली होती तर २०१७ साली भारत या स्पर्धेचा उपविजेता होता. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. एकदिवसीय सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा पाकिस्तानात होणार असली तरी भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला १२ वर्षांनंतर चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला एकदिवसीय चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!

# अजरामर : महात्मा गांधीजी

दिनविशेष
तन्मयी मेहेंदळे
अक्षरकला मिडिया ,पुणे

गांधी' हा चित्रपट बघितल्यामुळे महात्मा गांधी जगाला माहीत झाले, असे म्हणणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगाच्या गेल्या शतकातील इतिहासाची माहिती करून घेतली असती तर महात्मा गांधी हे नाव व त्यांचा सत्याग्रह आणि अहिंसेचा विचार जगात किती खोलवर रुजला आहे याची नरेंद्र मोदींना माहिती झाली असती. आज ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी आहे. महात्मा गांधी ज्यांना भारतात प्रेमाने "बापू" म्हटले जाते, त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.



भारतात परतल्यानंतर गांधीजींनी काँग्रेस अध्यक्ष गोपालकृष्ण गोखले यांची भेट घेऊन त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार साऱ्या देशात भ्रमण केले. देश जवळून बघितला आणि त्यातूनच पुढे लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर त्यांनी देशातील ब्रिटीशविरोधी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली. हा इतिहास सर्वांना माहीत आहे. साऱ्या जगात अनेक देशांमध्ये वर्ण वर्चस्ववादी गोऱ्यांच्या राजवटी होत्या. त्या सर्व देशांमध्ये महात्मा गांधींच्या विचारांमुळे प्रेरित झालेल्या कृष्णावर्णीयांचे लढे वाढत गेले. मानवतावादी विचारांची शिकवण महात्मा गांधींनी जगाला दिली आणि त्यामुळेच साऱ्या जगात महात्मा गांधींचे नाव अजरामर झाले.

आज जगामध्ये ७०हून अधिक देशांमध्ये महात्मा गांधींचे १२५ हून अधिक पुतळे उभारले गेले आहेत, तर १४०हून अधिक देशांनी त्यांच्या नावाने पोस्टाचे स्टॅम्प प्रसारित केले आहेत. अनेक देशांमध्ये अनेक रस्ते अथवा चौक, विद्यापीठातील लायब्ररी आदींना महात्मा गांधींचे नाव दिले गेले आहे. त्यांच्यावर साऱ्या जगात विविध भाषांमध्ये एक लाखहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि हे सारे 'गांधी' चित्रपट निघण्याच्या आधी कित्येक दशके होत राहिले आहे, याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदींना नाही, ही दुर्दैवाची बाब मानावी लागेल.

गेल्या शतकातील प्रमुख जागतिक नेते अमेरिकेचे रुझवेल्ट, ब्रिटनचे चर्चिल, इटलीचे मुसोलिनी, जर्मनीचे हिटलर, सोविएत युनियनचे स्टॅलिन, चीनचे चौ एन लाय ,व्हिएतनामचे हो ची मिन्ह अशांचे पुतळे त्यांच्या-त्यांच्या देशात उभारलेही गेले असतील, मात्र महात्मा गांधींचे पुतळे साऱ्या जगात उभारले गेले. हे जगाने महात्मा गांधींची महती ओळखल्यामुळेच झाले!




## राशीभविष्य

- **मेष :** कलेतून अर्थार्जन घडेल. कार्यक्षेत्रात प्रयत्नातून प्रगती घडेल. सामाजिक कार्यात अनुकूलता वाढेल.
- **वृषभ :** कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. नव्या संधींचं स्वागत करावं. चिकाटीने प्रगती घडेल.
- **मिथुन :** योजलेली कामं मनासारखी होतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणी कमी होत जातील.
- **कर्क :** अचानक धनलाभ होईल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता वाढेल. घाईने निर्णय घेणं टाळावं.
- **सिंह :** कामासाठी फार दगदग करू नका. नव्या संधी लाभणार आहेत. कामाचा व्याप फार वाढवू नका.
- **कन्या :** नव्या विचारांना गती प्राप्त होईल. उत्साह, धडाडी वाढणार आहे. कला-गुणांचा विकास होईल.
- **तूळ :** खर्च वाढले तरी प्राप्ती समाधानकारक होत जाईल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. बाकी चिंता नको.
- **वृश्चिक :** सौख्यदायी घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित प्रगती साधणं शक्य होईल.
- **धनु :** अनावश्यक खर्च टाळायला हवा. छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. कुलदेवतांची उपासना करावी.
- **मकर :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. चिकाटीने रहायला हवं. अपेक्षित कामं मनासारखी होणार आहेत.
- **कुंभ :** सरकारी कामं विलंबानं होणार आहेत. नव्या ओळखींमध्ये वाढ होईल. नव्या संधींचं स्वागत करावं.
- **मीन :** नव्या विचारांना चालना मिळेल. अनावश्यक खर्च टाळावेत. अपेक्षित कामं मनासारखी होतील.

मनातलं ओठांवर

## पोपटीची मेजवानी

कोकणात साधारणपणे नोव्हेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यापासून फेब्रुवारी-मार्चपर्यंत पोपटीच्या मेजवान्या रंगतात. शेतात असणाऱ्या भाज्या, शेंगा, रानटी उगवलेला भांबुर्डीचा पाला आणि घरून फक्त मीठ-मसाला आणुन हे शेतकरी पोपटी करतात. पोपटी मडक्यात भरून शिजेपर्यंत अर्धा-पाऊण तास. वेळ लागतो. या दरम्यान धमाल गप्पा रंगतात, जुन्या आठवणी, गाण्यांच्या घरगुती मैफिली यांची रंगत औरच असते. वालाच्या शेंगा, चवळीच्या शेंगा, रताळी, वांगी, बटाटे यांना मीठ मसाला लावून घेतलं जातं. मडक्याच्या बुडात भांबुर्डीचा पाला घालून त्यात भाज्यांचे थर दिले जातात. मांसाहारी प्रकारात चिकनला मसाला लावून केळीच्या पानात बांधून मडक्यात घातलं जातं. मडक्याचं तोंड पाल्याने नीट झाकलं जातं आणि ते उलटं ठेवून बाजुला गवत तसंच सुकेलेली लाकडं लावून शेकोटी पेटवली जाते. २० मिनिटानी मडकं बाजुला काढून पोपटी मोठ्या परातीत काढून त्याचा फडशा पाडायचा असा बेत असतो. अशा पोपटीचा आस्वाद एकदा तरी नक्की घ्या..!

## ३० जानेवारी

दिनविशेष

- **१९११ :** वि.दा.सावरकर यांना पन्नास वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.
- **१९४८ :** विमानाचा शोध लावणारे राईट ऑर्व्हिल यांचं निधन.
- **२०१३ :** भारतीय वंशाच्या महिला कृष्णा अरोरा यांना सामाजिक कार्याबद्दल ऑस्ट्रेलियातील सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
- **२०१४ :** केंद्र सरकारने वर्षाला नऊऐवजी बारा अनुदानित स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर देण्याचा निर्णय जाहीर केला.

महत्त्वपूर्ण काही...

## जीवनमान उंचावलं, पण...

सध्याच्या युगाचं वर्णन करायचं झाल्यास 'भौतिक सुखांची लोलुपता असणारं' युग असं यथार्थ वर्णन करता येईल. पूर्वीच्या काळाशी तुलना करायची झाल्यास सध्या माणसांचे शारीरिक कष्ट कमी झालं आहे. जीवनमान उंचावलं आहे. प्राथमिक गरजांची पूर्तता ही फारशी कष्टप्रद बाब राहिलेली नाही. असं असताना जुन्या पिढीच्या तुलनेत नवी पिढी अधिक सुखी आणि आनंदी असायला हवी. पण यासंबंधीच्या सर्वेक्षणातून पुढे आलेले निष्कर्ष याच्या विरुद्ध आहेत. जगातील आनंद अनुभवण्याची वृत्ती जाणून घेण्यासाठी संधोधकांनी जवळपास एक कोटी तीन लाख लोकांना प्रश्न विचारले. यात १३ ते ९६ या वयोगटातील लोकांचा समावेश होता. १९७२ पासून २०१४ पर्यंतच्या काळाचा विचार करताना आनंद उपभोगण्याची वृत्ती यावेळी तपासण्यात आली. त्यानुसार सर्व सुविधा असूनही १८ ते २९ या वयोगटातील लोकांनी आपण सुखी-समाधानी नसल्याचं सांगितलं. उलटपक्षी त्यांच्या वयात असताना आजच्याप्रमाणे सुखांची उपलब्धता नसूनही प्रौढ अथवा वृद्ध व्यक्तींनी अपार आनंद अनुभवल्याचं सांगितलं. ही पिढी आज युवकांपेक्षा जास्त आनंदी जीवन जगते असंही स्पष्ट झालं.

### पंचांग

**गुरूवार, ३० जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. १, नक्षत्र : धनिष्ठा
चंद्रराशी : मकर , व्यतिपात योग,
सूर्योदय : ७.१३, सूर्यास्त : ६.३०

### फॉरवर्डस

'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' असं म्हटलं जातं ते उगाच नव्हे...

**कुदरत ने सबको हीरा ही बनाया है, शर्त है जो घिसेगा वही चमकेगा...**

आरोग्यमंत्र

## जाणा या विकारांबद्दल...

आजकाल सेल्फीचे वेड बरंच वाढल्याचं पहायला मिळत आहे. या वेडापायी आजवर काहींना जीव गमवावा लागला तरी काही जायबंदी झाले. सातत्याने सेल्फी काढत राहणं आणि त्या ऑनलाईन शेअर करण्याचं व्यसन असेल तर 'सेल्फीटिस' हा मानसिक विकार असण्याची शक्यता असते. सेल्फी काढणं आणि इंटरनेटवर टाकणं याच्या प्रमाणावरून 'सेल्फीटिस'चं वर्गीकरण करण्यात आलं आहे. तीव्र, मध्यम आणि सौम्य असे याचे तीन प्रकार आहेत. महिलांच्या तुलनेत पुरूषांमध्ये सेल्फी काढण्याचं आणि ते शेअर करण्याचं प्रमाण जास्त असतं असं एक अहवाल सांगतो. १६ ते २० वयोगटातील लोक याला बळी पडण्याची सर्वाधिक शक्यता असते.



खिशात किंवा पर्समध्ये ठेवलेला फोन व्हायब्रेट होत असल्याचं वाटून आपण तो बाहेर काढतो. पण प्रत्यक्षात फोन वाजलेला नसतो. असतो तो फक्त आभास. मोबाईलचा सातत्याने वापर करणाऱ्या ७० टक्के लोकांना या विकाराने ग्रासलं आहे. याला 'रिंग्झायटी' असंही म्हटलं जातं. यात प्रत्यक्षात अस्तित्त्वात नसलेल्या संवेदनांची जाणीव मेंदूला होते. हवी असलेली माहिती आपल्याला गुगलवर मिळते. त्यामुळे मेंदूची लक्षात ठेवण्याची क्षमता कमी झाली आहे. याला 'गुगल इफेक्ट' असं नाव देण्यात आलं आहे. मेंदूची क्षमता कमी होत जाणं ही बाब गंभीर मानली जात आहे. मोबाईल फोनशिवाय राहण्याची अनामिक भीती किंवा विशिष्ट कारणामुळे त्याचा वापर न करता आल्याने येणारी अस्वस्थता ही नोमोफोबिया या विकाराची लक्षणं आहेत.

वाचा तर खरं

✻ पालकामध्ये लोह आणि मॅग्नेशियमची मात्रा असल्यानं डोक शांत होण्यास मदत होते त्याचप्रमाणे पचनसंस्था सुधारुन तणाव कमी होतो. ✻ नैराश्य कमी करण्याच्या कामी मॅग्नेशियमची मोलाची मदत होते आणि बदामामध्ये हा घटक मोठ्या प्रमाणात आढळतो. १०० ग्रॅम बदामात २३८ ग्रॅम मॅग्नेशियम असतं ज्यामुळे मॅग्नेशियमची दिवसभराची ६७ टक्के गरज भागू शकते. ✻ मूड ठीक ठेवण्यासाठी टोमॅटोचं सेवन उपयुक्त ठरतं. टोमॅटोमध्ये लाइकोपीन आणि अँटीऑक्सिडंटची पर्याप्त मात्रा असल्यानं नैराश्य दूर होण्यास मदत होते. ✻ तणावग्रस्त अवस्थेत जांभळाचं सेवन परिणामकारक ठरतं.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## कोरेगाव भीमात महिला खेळाडूच्या हस्ते ध्वजवंदन



**शिक्रापूर :** एकीकडे ध्वजारोहणाच्या मानावरुन अनेक ठिकाणी राजकारण सुरु असताना शिरुर तालुक्यातील कोरेगाव भिमा ग्रामपंचायतचे सरपंच संदीप ढेरंगे यांनी मात्र प्रजासत्ताक दिनी स्वतःचा ध्वजवंदनाचा मान महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या महिला खेळाडूला देऊन जनतेपुढे आगळावेगळा आदर्श घालून दिला आहे. कोरेगाव भीमा येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामपंचायतचे ध्वजारोहण सरपंच संदीप ढेरंगे यांच्या हसरे होत असताना त्यांनी ध्वजारोहणचा मान गावातील महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या आदर्श महिला खेळाडूला दिला, यावेळी सरपंच संदीप ढेरंगे, उपसरपंच सविता घावटे, ग्रामपंचायत सदस्य अमोल गव्हाणे, केशव फडतरे, महेश ढेरंगे, गणेश कांबळे, शरद ढेरंगे, अनिकेत गव्हाणे, वंदना गव्हाणे, मनीषा गव्हाणे, जयश्री गव्हाणे, कोमल खलसे, शिल्पा फडतरे, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत वाव्हळ यांसह आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य महेश ढेरंगे यांनी केले तर प्रास्ताविक माजी सरपंच विजय गव्हाणे यांनी केले आणि सरपंच संदीप ढेरंगे यांनी आभार मानले.

## ऊसतोड कामगारांनी बिबट्यापासून काळजी घ्यावी



**शिक्रापूर :** सध्या अनेक शेतात ऊसतोड सुरु असताना कित्येक ठिकाणी बिबट्या देखील निदर्शनास येत असून, शेतामध्ये ऊसतोड करताना ऊसतोड कामगारांनी विशेष खबरदारी व काळजी घ्यावी, असे आवाहन शिरुर वनविभागाच्या वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांनी केले आहे. शिक्रापूरसह परिसरात अनेक ठिकाणी बिबट्याचा वावर दिसत असताना, कित्येक ठिकाणी ऊसतोड सुरु असल्याने वनविभागाच्या वतीने बिबट जनजागृती करण्यात येत आहे. नुकतेच शिरुर वनविभागाच्या वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे, नियतक्षेत्र अधिकारी प्रमोद पाटील, वनमजूर बाळासाहेब घोलप, वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख, शुभम वाघ यांनी उसतोड सुरु असलेल्या शेतामध्ये भेट देत पाहणी केली. ऊसतोड कामगारांनी शेतात काम करताना लहान मुलांना लांब ठेवावे, मुलांना शेतातील आडोशाला झोपवू नये, काम करताना एका इसमाने शेतातील आजूबाजूला लक्ष ठेवावे, वेळोवेळी आवाज करावा, शेतात काम करताना मोबाईल वर गाणी लावावी, अंधार पडल्यानंतर शेतात काम करु नये तसेच शेताच्या परिसरात बिबट्या अथवा बिबट्याची पिल्ले आढळून आल्यास शेतमालक व वनविभागाला माहिती द्यावी असे आवाहन शिरुर वनविभागाच्या वनपरिमंडल अधिकारी गौरी हिंगणे यांनी केले आहे.

## श्री धर्मनाथ महाराज यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यती

**लोणी-धामणी :** रानमळा (ता. आंबेगाव ) येथे श्री धर्मनाथ महाराज यात्रा ( बिज ) निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार (दि. ३१) रोजी सकाळी ७ ते ८ वाजता देवास हारतुरे व महापूजा, सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजता बैलगाड्यांच्या भव्य जंगी जर्यती, सायंकाळी ७ ते ९ वाजता देवास नैवद्य, दिपोत्सव व भव्य मिरवणूक व



शोभेचे दारुकाम, रात्री नऊ वाजता तुकाराम खेडकर सह पांडूरंग मुळे मांजरवाडीकर यांचा लोकनाटय तमाशाचा कार्यक्रम होईल.तसेच रात्री ११ ते पहाटे ५ वाजता चक्रीय भजनाचा कार्यक्रम होईल. बैलगाड्याच्या भव्य जंगी जर्यती साठी एकूण इनाम १,७७,०११/ रुपये, तीन कूलर, एक जूपता बैलगाडा, दोन टेबल फॅन, दोन सिलिंग फॅन तसेच . प्रथम क्रमांकास ५१००१/ रूपये, व्दितीय क्रमांकास ४१००१/ रूपये, तृतीय क्रमांकास ३१००१/ रूपये, चतुर्थ क्रमांकास २१००१/ रूपये. घाटाचा राजा यासाठी एकभव्य ट्रॉफी व एक कारभारी सेट तसेच फायनल साठी प्रथम क्रमांकास १५००१/ रूपये, व्दितीय क्रमांकास ११००१/ रुपये, तृत्तीय क्रमांकास ७००१/ रुपये असे बक्षिस ठेवले असून बुधवार (दि.२९) रोजी सकाळी ८ ते १२ वाजता टोकन काढले जातील टोकन फी १०००/ रूपये असून ५००/ रुपये परत केले जातील व ५००/ रूपये देणगी स्वरूपात स्विकारले जातील. शनिवार (दि.०१) रोजी सकाळी नऊ वाजता देवास दंडवत व शेरणी कार्यक्रम होईल. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन समस्थ ग्रामस्थ रानमळा (लोणी), मुंबई, ठाणे, पुणे येथील मंडळीनी केले आहे.अशी माहिती ग्रामस्थांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

# बंद टोलनाका अपघाताचे कारण!

## निरुपयोगी बांधकाम तात्काळ काढून टाकण्याची होत आहे मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर कासुर्डी (ता.दौंड) येथे बंद झालेला टोलनाका आता अपघाताला निमंत्रण देत असून त्याठिकाणी छोटेमोठे अपघात रोज होत आहेत. हा टोलनाका बंद झाला तरीदेखील येथे टोलनाक्याचे लोखंडी शेड उभे आहे त्याचबरोबर दुभाजक देखील जैसे थे असल्याने याठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढू लागले आहे. बंद पडलेल्या परिस्थिती मधील टोलनाका आणि त्याठिकाणी असणारे निरुपयोगी बांधकाम तात्काळ काढून रस्ता सुस्थितीत आणि अतिक्रमणमुक्त करावा, अशी मागणी आता स्थानिक नागरिक करीत आहेत.

पुणे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या कदमवाकवस्ती व कासुर्डी येथील टोलनाक्याची टोलवसुली मुदत ३१ मार्च २०१९ मध्ये संपली आहे.



तेव्हापासून हा टोलनाका आजही बंद अवस्थेत आहे. परंतु टोल वसुलीसाठी उभे केलेले शेड व दुभाजक आजही आहे त्या परिस्थितीतच आहेत. यामुळे रात्री, पहाटे व काही वेळा दिवसादेखील वाहन चालकांना याचा अंदाज येत नसल्याने अनेक वाहने या दुभाजकाला तर कधी शेडला धडकून वारंवार अपघात घडत आहेत. काही दिवसांपूर्वीच एक बस टोल वसुलीसाठी ठेवलेल्या केबिनला धडकली होती.

अपघातानंतर ही अडथळा ठरणारी केबिन तात्काळ बाजूला करण्यात आली होती; परंतु अजूनही शेड व दुभाजक यांना अपघात नियंत्रण करण्यासाठी कोणत्याही उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. मंगळवारी सकाळी सोलापूरकडून पुण्याकडे गॅस सिलिंडेर घेऊन जाणाऱ्या एका ट्रक चालकाला अंदाज न आल्याने ट्रक उलटला. सुदैवाने ट्रकमधील सिलिंडर हे रिकामे असल्याने मोठा अपघात टळला. ट्रक चालकाला किरकोळ दुखापत झाली असून या ठिकाणी वारंवार अपघात घडत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. तरी टोल नाका परिसरात असलेले अनावश्यक शेड हे तात्काळ बाजूला करून रस्ता सुरळीत करण्यात यावा, जेणेकरून अपघाताचा धोका टळेल.यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने संभाव्य धोका लक्षात घेऊन टोल वसुली कार्यालयाचे बांधकाम हटविण्याची मागणी प्रवासी,वाहतूकदार व नागरिकांकडून होत आहे.

### बॅनरबाजीसाठी टोलनाक्याचा वापर....

● सरकारच्या नियंत्रणात असलेला हा कासुर्डी टोलनाक्यासाठी उभारलेल्या शेडचा विनापरवाना बॅनरबाजी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. यातून सरकारच्या ताब्यातील मालमत्तेवर काही बॅनरबाजी करणारे ठेकेदार हे गब्बर होऊ लागले असल्याचे बोलले जाऊ लागले आहे. याबाबत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चर्चा नागरिकांमध्ये चालू आहेत. यातील काही हिस्सा हा प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांच्या वाट्याला दिला जात असल्याची उलट सुलट चर्चा देखील नागरिकांना मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे.

## राष्ट्रीय सेवा योजेनेतून विद्यार्थी घडतात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून स्वयंसेवक विद्यार्थ्यावर संस्कार करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जाते. तसेच विद्यार्थ्यांच्या सामाजिक सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी हे शिबिर म्हणजे संस्काराचे खरे घर व केंद्र आहे. असे प्रतिपादन शिक्षण प्रसारक मंडळे पाबळचे अध्यक्ष व विद्यमान सरपंच सोपान जाधव यांनी लोणी (ता. आंबेगाव ) येथे व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या श्री पद्ममणी जैन कला व वाणिज्य महाविद्यालय पाबळ (ता. शिरूर ) चे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिर लोणी (ता. आंबेगाव ) येथे नूकतेच संपन्न झाले. यावेळी समारोप कर्लक्रमात जाधव बोलत होते. कार्यक्रमाच्या समारोप समारंभास शिक्षण प्रसारक मंडळ पाबळचे अध्यक्ष सोपानराव जाधव, उपाध्यक्ष कुमार बगाटे सर्व संचालक मंडळ तसेच मंत्रालयातील महसूल विभागाचे सहसचिव कैलास गायकवाड, लोणी गावचे सरपंच सावळेराम नाईक, उपसरपंच स्वाती वाळुंज यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## चंदुकाका जगताप यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त

# सासवड शहरात विविध उपक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** दिवंगत लोकनेते चंदुकाका जगताप यांच्या सातव्या पुण्यसमरणानिमित्त चंदूकाका जगताप यांच्या सासवड येथील वैकुंठ भूमीतील स्मृतीस्थळावर तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित इंग्लिश मीडियम स्कूल येथील "सहकाररत्न चंदुकाका जगताप स्मारक" येथील स्व चंदूकाका जगताप यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला कुटुंबीयांकडून पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त स्व चंदूकाका जगताप यांच्या कुटुंबीयांकडून भजन आणि भक्तीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक, शैक्षणिक, सहकारी संस्थांमध्ये अनेक उपक्रमांनी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



याप्रसंगी चंदूकाका जगताप यांच्या पत्नी सासवडच्या माजी नगराध्यक्षा आनंदिकाकी जगताप, सुपुत्र सनदी अधिकारी राजेंद्रबापू जगताप, पुरंदर - हवेलीचे माजी आमदार संजय जगताप, स्नुषा भारती हॉस्पीटलच्या प्रमुख डॉ अस्मिता जगताप, ग्रामीण सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, कन्या अर्चना मोरे, सोनाली शिंदे, विकास जगताप, नातवंडे अभिश्री जगताप, समरादित्य जगताप, रेवा जगताप, राघवेंद्र जगताप यांसह वसंतराव शिंदे, प्रदीप पोमण, अभिजित जगताप, माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, प्रकाश पवार, संदीप फडतरे, देविदास कामथे, राजेंद्र बडदे, सुनिता कोलते, संभाजी काळाणे, चंद्रकांत बोरकर, कुंडलिक मेमाणे, इस्माईल सय्यद, संजय टिळेकर, लाला भंडलकर, माजी उपनगराध्यक्ष यशवंतराव जगताप, संदीप जगताप, अजित जगताप, संतोष गिरमे, सागर जगताप, रोहित इनामके, सचिन कोंडे, सौरभ जाळिंद्रे, गुलाब गायकवाड, विलास जगताप, नितीन निगडे, जयेश गद्रे, तुषार जगताप, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, सतिश शिंदे, हरीभाऊ शिंदे, भाऊसाहेब कापरे, कानिफनाथ आमराळे, राजेंद्र जाधव, प्राचार्य नंदकुमार सागर, उत्तम निगडे, नंदकुमार बारवकर, विजय काकडे, शिवाजी कोलते, विजय चिकणे, हरीभाऊ टापरे, एच एन पवार, एम एस जगताप, सतिश पिसाळ, शांताराम राणे, प्राचार्या रेणुकासिंग मर्चंट, सरिता कपूर, प्रीया गायकवाड यांसह विविध संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी, सासवडकर नागरिकांनी स्व चंदूकाका जगताप यांना अभिवादन केले. पुण्यस्मरणानिमित्त विविध संस्थांमधून कर्मचा-यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

## गावच्या सहकार्यामुळेच सामाजिक कार्यात प्रेरणा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** आपण ज्या गावात जन्माला आलो, ज्या मातीत वाढलो तेथील लोकांशी मिळून राहणे त्यांच्या बरोबर राहून गावची नाळ टिकवून ठेवणे आवश्यक असते. आपण कितीही मोठे झाली तरी गावात सामान्य नागरिक म्हणूनच वावरल्यास गावकऱ्यांकडून मिळणारी शाबासकीची थाप ही पुरस्कारापेक्षा मोठी असते. म्हणून गावचे गावपण मी जपत आलो आहे. आणि यापाठीमागचे कारण म्हणजे गावकऱ्यांकडून मला मिळणारी समाज कार्याची प्रेरणा होय. गावातील बुजुर्गांनी मला सांभाळून घेतले, गावकऱ्यांनी सत्य मार्गावरून चालण्यास शिकवले. म्हणूनच आपलेपणा काय असतो हे मला बघायला मिळाले, अशा शब्दात चैतन्य बहुद्देशीय कृषी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश भालेराव यांनी गावाबद्दल आदर व्यक्त केला आहे.

चांबळी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त चैतन्य बहुउद्देशीय कृषी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कर देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सरपंच प्रतिभा कदम, उपसरपंच संजय कामठे, सदस्य संतोष कटके, नाना शेंडकर, वैजयंता शेंडकर, स्वाती शेंडकर, स्वाती कामठे, मनीषा कामठे, सुषमा कामठे, ग्रामसेवक राखी डागारे, तलाठी जगदाळे भाऊसाहेब, चांबळीचे माजी सरपंच पोपट शेंडकर, पोलीस पाटील विश्वनाथ शेंडकर, सोसायटीचे चेअरमन प्रसाद कामठे, संतोष शेंडकर, राहुल कामठे, शरद कामठे, शिवदत्त कामठे, रघुनाथ कामठे, विठ्ठल कामठे, महेश कामठे तसेच महिला आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## एमआयडीसी कार्यालयासमोर ठिय्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** रांजणगाव एमआयडीसी येथील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर लिमिटेड ही कंपनी बंद करण्यासह प्रमुख मागण्यांसाठी रांजणगाव एमआयडीसी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर स्थानिक ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले.

येथील एमआयडीसी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर सकाळी ११ वाजता सुरु झालेल्या या ठिय्या आंदोलनात सरपंच उज्ज्वला इचके, माजी सरपंच सुप्रिया पावशे, माजी सरपंच सचिन सांबारे, संजय पावशे,अंकुश इचके,उत्तम व्यवहारे, उपसरपंच विकास रासकर,रविंद्र पावशे,डॉ.संतोष शिंदे,संतोष सांबारे, अविनाश सांबारे, फक्कड सांबारे,कुमार नाणेकर यां सह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

या कंपनीच्या प्रश्नांबाबत शुक्रवारी, दि. ३१ रोजी पुणे येथील एमआयडीसी कार्यालयात एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी पाटील यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येणार असल्याचे एमआयडीसीच्या क्षेत्र व्यवस्थापक आर.आर.देशमुख यांनी यावेळी सांगितले. एमआयडीसीने या कंपनीला दिलेले ५३ एकर वाढीव क्षेत्र तातडीने रद्द करावे, अन्यथा १६ फेब्रुवारीला तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माजी सरपंच व्यवहारे व उपस्थित ग्रामस्थांनी दिला. यावेळी 'एमईपीएल हटाव,गाव बचाव,एमईपीएल कंपनी बंद झालीच पाहिजे' या घोषणा देण्यात आल्या. रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## ग्रामस्थांचे आंदोलन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा




कारेगाव महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर लिमिटेड ही कंपनी बंद करण्यासह प्रमुख मागण्यांसाठी रांजणगाव एमआयडीसी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर स्थानिक ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले.

## संत सोपानकाका महाराज मंदिर प्रांगणात हरीनामाचा गजर

# चंदूकाका जगताप यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भजन स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सहकारमहर्षी चंदूकाका जगताप यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त सासवड (ता. पुरंदर) येथील संत सोपानकाका महाराजांच्या संजीवन समाधी मंदिराच्या प्रांगणात पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांच्या आयोजनातून आणि सासवड सांस्कृतिक मंडळ व बोपगाव भजनी मंडळ यांच्या संयोजनातून खुला गट आणि लहान गटात सलग सातव्या वर्षी भव्य भजन स्पर्धा संपन्न होत आहेत. यानिमित्त दोन दिवस (दि २९ व दि ३०) या



परिसरात विठ्ठनामाचा गजर सुरु राहणार आहे. पुरंदर हवेलीतील सुमारे ८१ भजनी मंडळांनी यात सहभाग नोंदविला आहे.

बुधवारी (दि. २९) सनदी अधिकारी राजेंद्रबापू जगताप, माजी आमदार संजय जगताप, प्रदीप पोमण, प्रकाश पवार, सुधाकर गिरमे, दत्तात्रय फडतरे, बाळासो फडतरे, संदीप फडतरे, समरादित्य जगताप, दत्तात्रय बांदल, अनिल मेमाणे, विजय अधिकारी, संभाजी काळाणे, विठ्ठल मोकाशी यांच्या हस्ते संत सोपानकाका महाराज व स्व चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमेचेसह मृदूंग, वीणा, टाळ पूजन व दीपप्रज्वलनाने तसेच सासवडच्या श्री हनुमान भजनी मंडळाच्या पंचपदीने या सोहळ्याला सुरुवात झाली. पुणे येथील तबला अलंकार सतिश काळे आणि संगीत विशारद ज्ञानेश्वर ढवळे स्पर्धांचे परीक्षण करीत आहेत. प्रसिद्ध निवेदक महेश राऊत यांनी सुत्रसंचलन केले. सहभागी सर्व संघांना ग्रामीण संस्थेच्या वतीने अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या संकल्पनेतून संत सोपानकाका महाराज लिखित सोपानदेवी ग्रंथ आणि सर्व अभंगांचे संच भेट देण्यात आले. यावेळी सखाराम लांडगे, अनिल उरवणे, चंद्रशेखर जगताप, सतिश शिंदे, विश्वजीत आनंदे, प्राचार्य नंदकुमार सागर, हनुमंत पवार, लक्ष्मण गोळे, कानिफनाथ आमराळे, हरीभाऊ शिंदे स्पर्धा संयोजन समितीचे लक्ष्मण यादव, पी बी वाघले, सुभाष थिटे, सचिन झांबरे, किसन पवार, संजय काटकर, प्रवीण पवार, दीपक जगताप, संदीप इनामके, प्रा मनिषा कामठे तसेच पांडूरंग दुर्गाडे, मोहन नातू, रामप्रभू पेटकर आदींसह पुरंदर हवेलीतील भजनी मंडळांचे सदस, संत सोपानकाका सहकारी बँक, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था, पुरंदर मिल्क अँड ॲग्रो प्रो लि, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, इंदिरा नागरी सहकारी पतसंस्था आदी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### बक्षीस वितरण गुरुवारी

● बक्षीस वितरण समारंभ गुरूवारी होणार असून दोन्ही गटातील प्रथम पाच क्रमांकांच्या विजेत्या संघांना अनुक्रमे ११ हजार, ९ हजार, ७ हजार, ५ हजार आणि ३ हजार रुपयांची रक्कम स्व चंदूकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या संत सोपानकाका सहकारी बँक, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, पुरंदर मिल्क, इंदिरा महिला सहकारी पतसंस्था या संस्थांच्या तसेच मित्र परिवाराचे प्रकाश पवार, संजय म. जगताप, म्हस्कू दळवी, वसंतराव शिंदे, शरदचंद्र जगताप, अजित जगताप यांच्या वतीने देण्यात येणार आहे. उत्कृष्ट गायक, उत्कृष्ट हार्मोनियम आणि उत्कृष्ट तबला, मृदुंग वादकांना कला दिग्दर्शक संदीप इनामके यांच्या वतीने बक्षीस देण्यात येणार आहे.

# अस्मिता

## मुगडाळीचे चटपटीत स्टिक्स

रसगंधा

चहाबरोबर काही चटपटीत खावंसं वाटतं. एरवीही मुलांना डब्यात देण्यासाठी काही ना काही करुन ठेवावचं लागतं. पण नेहमीचे प्रकार करुन कंटाळला असाल तर मूग डाळ स्टिक करुन पहा. या स्टिक पौष्टिक आहेतच शिवाय चटपटीत असल्यामुळे झटपट फस्त होणाऱ्याही आहेत.

सामग्री: दोन वाटी मुगाची डाळ (दळलेली), दोन चमचे कॉर्नफ्लावर, एक चमचा लाल तिखट, एक चमचा आलं-लसुण पेस्ट, एक चमचा हिरव्या मिरचीचा ठेचा, दोन चमचे बारीक रवा, एक चमचा ओवा, एक चमचा चाट मसाला, स्टिक्स तळण्यासाठी तेल, चवीनुसार मीठ इत्यादी.



कृती: वरील साहित्यातील चाट मसाला आणि तेल वगळून सर्ग सामग्री एका बाऊलमध्ये एकत्र करुन चांगली मिसळून घ्या. आता थोडं पाणी घालून मिश्रण कणकेसारखं मळून घ्या. या मिश्रणाच्या जाडसर पोळ्या लाटायच्या आहेत. पोळ्या लाटल्यावर सुरीने लांबट स्टिक्स कापून गरम तेलात तळून घ्या. स्टिक्स गरम असतानाच त्यावर थोडं मीठ, तिखट आणि चाट मसाला भुरभुरा. सॉसबरोबर खायला द्या.

## मधुमेहाचा धोका ओळखा

टेक केअर

मधुमेह जडणं हा जीवनशैलीतील बदलांचा परिपाक असतो. सध्या अनेकांना मधुमेहाच्या समस्येने ग्रासलेलं आढळतं. व्यक्तीला कोणत्याही वयामध्ये गाठू शकणारा हा आजार सध्या चिंतेचं कारण बनत आहे. विशेष म्हणजे स्त्रियांमध्ये मधुमेहाचं निदान होण्यास वेळ लागतो. याचं मुख्य कारण म्हणजे स्त्रियांचं आरोग्याकडे होणारं दुर्लक्ष... महिला नेहमीच आरोग्याच्या तक्रारींकडे कानाडोळा करत राहतात. वेळच्या वेळी तपासण्या करुन घेण्याकडे त्यांचं लक्ष नसतं. त्यामुळे आजाराचं स्वरूप गंभीर होण्यास वेळ लागत नाही. आजार पुढच्या अवस्थेत पोहोचतो. म्हणूनच मधुमेहाचा त्रास असणाऱ्या स्त्रियांनी या आजारापासून स्वत:चा बचाव कसा करावा याविषयीच्या




काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.

✻ **संसर्ग :** रक्तातल्या शर्करेचं प्रमाण वाढत असल्यास मायक्रोबायल संसर्गाची शक्यता वाढते. या संसर्गामुळे जखम लवकर बरी होण्यास अडथळा निर्माण होतो. त्या जखमांमुळे संसर्ग होण्याचा धोका मोठा असतो. या आजारात युरिनरी ट्रॅक इन्फेक्शन (युटीआय) किंवा श्वसनमार्गातील संसर्गही होऊ शकतो. म्हणूनच अशा लक्षणांवर वेळीच उपाय करायला हवा.

✻ **पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोम :** मधुमेहामध्ये पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोमची (पीसीओएस) शक्यता अनेक पटींनी वाढते. मधुमेहामुळे हार्मोन्सचा समतोल बिघडतो. परिणामी शरीरावर त्याचे परिणाम दिसू लागतात. म्हणूनच मधुमेह जडलेल्या महिलांनी संप्रेरकांमधील बदलांकडे लक्ष द्यावं.

✻ **मासिक पाळीपूर्वीचा त्रास :** रक्तशर्करेच्या असंतुलनामुळे मासिक पाळीपूर्वीच्या त्रासामध्ये वाढ होऊ शकते. पाळी येण्यापूर्वी पोटदुखी, भावनिक चढ-उतार, थकवा आदी त्रासाला सामोरं जावं लागू शकतं.


✻ **नैराश्य :** मधुमेही पुरुषांच्या तुलनेत मधुमेह असणाऱ्या महिलांना नैराश्याचा त्रास दुपटीने जाणवतो. त्यामुळेच महिलांनी सतर्क रहावं.

## शिखरांची सम्राज्ञी

मानिनी

**गिर्यारोहण हा भर तारुण्यात आनंद घ्यावा असा क्रीडाप्रकार असल्याचं अनेकांचं मत असतं. मात्र संगीता सिंधी बहल यांनी वयाच्या ४६ व्या वर्षी गिर्यारोहणाला सुरुवात केली आणि मोठ्या आत्मविश्वासाने आफ्रिकेतलं सर्वात उंच 'माउंट किलीमांजारो' शिखर**

गिर्यारोहण हा मानसिक ताकत आणि धारिष्ट्याबरोबरच शारीरिक कसोटी पाहणारा धाडसी क्रीडाप्रकार आहे. यासाठी तंदुरूस्तीही नितांत आवश्यकता असते. त्यामुळेच तारुण्याचा बहर असताना याकडे बघावं असा सर्वसाधारण समज असतो. पण गिर्यारोहणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना ५१ वर्षांची, एका मुलाची आई असणारी स्त्री जगातली सर्वोच्च म्हणवली जाणारी शिखरं सर करण्याचा निश्चय करते तेव्हा हा समज खोटा ठरतो. प्रौढ वयात गिर्यारोहण ही कठीण वाटणारी बाब संगीता सिंधी बहल प्रत्यक्षात आणतात. एका सकाळी न्याहारी करत असताना त्यांच्या पतीने, अंकुर यांनी 'माझ्यासोबत गिर्यारोहणाला येणार का' असं सहज विचारलं आणि संगीताच्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली. इमेज कन्सल्टींगच्या व्यवसायात असणाऱ्या संगीता यांनी हे नवं क्षेत्र पादक्रांत करायचं ठरवलं. कोणतंही शिखर



चढण्यासाठी पूर्वतयारी करणं गरजेचं असतं. बहल दांपत्यानेही तयारी सुरू केली. तब्बल चार महिने ते जीममध्ये गेले. खूप घाम गाळला. वजन कमी केलं आणि तंदुरूस्तीची ठराविक पातळी गाठली. त्यानंतर ३१ डिसेंबर २०११ रोजी त्यांनी १९,३४१ फूट उंचीचं 'माउंट किलीमांजारो' हे आफ्रिकेतलं सर्वोच्च शिखर सर केलं. ही चढाई सोपी नव्हतीच. पण योग्य प्रशिक्षण घेतल्यानं दोघांनीही आव्हान पेललं आणि १९,३४१ फूट उंचीचं हे शिखर जोडीनं सर केलं. त्यानंतर संगीता यांचा आत्मविश्वास अनेकपटींनी वाढला. मग जुलै २०१३ मध्ये त्यांनी १८,५०० फूट उंचीचं युरोपमधलं सर्वोच्च 'माउंट इब्रस' हे शिखर सर केलं. २०१४ च्या जानेवारीत त्या अंटार्टिकाला पोहोचल्या आणि १६,००० फूट उंचीचं 'माउंट विंसन' हे शिखर सर केलं. उत्तर अमेरिकेतलं २०,३१० फूट उंचीचं 'माउंट मॅकिन्ले' हे शिखर चढताना त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यामुळे गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. दुखापत झाली तेव्हा त्या १५ हजार फूट उंचीवर होत्या. आता पुन्हा गिर्यारोहण करता येणार नाही, असं प्रशिक्षकानं त्यांना सांगितलं. पण संगीताजींनी हार मानली नाही. सहा महिन्यातच त्यांनी 'माउंट ॲकॉन्कागुआ' शिखरावर चढाई करून तो फोटो मार्गदर्शकाला पाठवला. आता 'माउंट मॅकेन्ले' पुन्हा सर करण्यासाठी त्या प्रशिक्षण घेत आहेत. अपूर्ण राहिलेली चढाई त्यांना पूर्ण करायची आहे. हेच नव्हे तर प्रत्येक खंडातलं सर्वोच्च शिखर त्यांना पादाक्रांत करायचंय. जगात सर्वात उंच अशी सात शिखरं आहेत. त्यापैकी काही सर केली आहेत. उर्वरित शिखरंही सर करायची आहेत. यासाठी त्या प्रचंड मेहनत घेत आहेत. आठवड्यातले सहा दिवस दररोज दोन तास त्या प्रशिक्षण घेतात. सातही शिखरं सर करून त्यांना सर्वात वयस्कर भारतीय महिला गिर्यारोहक हा मान पटकवायचा आहे.

### स्कीन केअर

#### मॉईश्चरायजरचं प्रमाण किती असावं ?




आपण विविध सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. त्यातही चेहऱ्यावर वेगवेगळे प्रयोग केले जातात. ही सौंदर्य प्रसाधनं विशिष्ट प्रमाणात वापरणं गरजेचं असतं. चेहऱ्याचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉईश्चरायजर लावलं जातं. मात्र ते जास्त प्रमाणात लावलं तर त्वचा तेलकट होऊ शकते. दररोज एका बदामाच्या आकाराएवढं मॉईश्चरायजर घेऊन चेहरा आणि मानेला लावा. क्रीम त्वचेच्या आता शोषलं जाईपर्यंत हलक्या हाताने मसाज करत राहा. यामुळे तुमचा चेहरा तजेलदार दिसेल.

### हेअर केअर

#### लावा अंड्याचं तेल

केसांच्या वाढीसाठी आपण विविध प्रकारच्या तेलांचा वापर करतो. मात्र अंड्याच्या तेलाबद्दल तुम्ही कधी ऐकलं आहे का? अंड्याच्या पिवळ्या भागापासून हे तेल तयार केलं जातं. तुम्ही घरच्या घरी तेल बनवू शकता. यासाठी अंडी



उकडून घ्या. सोलून पिवळा भाग काढून कुस्करून घ्या. आता एका कढईत हा पिवळा भाग काळा पडेपर्यंत परतून घ्या. काळा झालेला पिवळा भागाचा गोळा करून तो पिळून घ्या. त्यातून तेल निघेल. हे तेल बाटलीत भरून ठेवा. आठवड्यातून दोन वेळा लावा. यामुळे केस चमकदार होतील शिवाय त्यांची वाढही चांगली होईल.

### हेल्दी लाईफ

#### आहारात असू द्या फॉस्फरस

अन्नातून मिळणारा फॉस्फरस हा घटक वजन कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. पोटाचा घेर कमी करायचा असेल तर फॉस्फरसयुक्त अन्न खायला हवं. प्रौढ व्यक्तीला दररोज ७०० एमजी फॉस्फरसची गरज असते. गहू, चिकन, दुधीच्या बिया, सोयाबिन, जवस, राई, डाळी, अंडी, ओट्स, दाणे अशा पदार्थांमधून आपल्याला



मुबलक प्रमाणात फॉस्फरस मिळतं. या घटकामुळे किडनीचं आरोग्यही उत्तम राहतं. त्यामुळे आपल्या आहारात फॉस्फरसयुक्त पदार्थांचा नक्की समावेश करा.

## रंगते पार्टी अशीही...

सौंदर्यसाधना

लग्नसमारंभानिमित्त रंगणाऱ्या पार्ट्यांमध्ये उत्सवमूर्तींइतकीच पाहुणेमंडळीही सजून धजून येतात आणि वातावरणात आगळा रंग भरतो. साधारणपणे संध्याकाळच्या आल्हाददायक वातावरणात रंगणाऱ्या या पार्टीसाठी मेकअपही साजेसा हवा. दिवसाचा मेकअप आणि रात्रीचा मेकअप करण्याची पद्धत वेगवेगळी आहे.



शिवाय सध्याचे थंडीचे दिवस लक्षात घेता मेकअप करताना याचेही भान ठेवणे गरजेचे आहे. मेकअपप्रमाणे वेषभूषा आणि अलंकार कसे असावेत याचीही परिमाणे दिवस-रात्रीसाठी वेगवेगळी असतात. रात्रीचा मेकअप करताना सर्व प्रसाधने डार्क शेडची असावीत. यामुळे आकर्षक लूक मिळण्यास मदत होते. मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्यावर दहा मिनिटे बर्फ फिरवून घ्यावा. अर्थातच थंडीच्या दिवसात हे शक्य नाही मात्र उन्हाळ्यात हा उपाय करता येईल. यामुळे चेहऱ्यावर घाम येत नसल्यामुळे चेहरा तेलकट दिसण्याचा धोका कमी होऊन मेकअप जास्त काळ टिकतो. फाऊंडेशन लावताना त्यात थोडे बर्फाचे पाणी घातल्यासही तो चेहऱ्यावर एकसारख्या पद्धतीने बसतो. चेहरा, कान, मान, गळा आदी ठिकाणी फाऊंडेशन पसरल्यानंतर त्वचेशी मिळत्याजुळत्या छटेचे कॉम्पॅक्ट लावावे. त्यानंतर मॅच होईल असा रुज लावावा. डोळ्याच्या मेकअपमध्ये लायनर, कपड्याच्या रंगाशी सुसंगती साधणारी आयशेड, डार्क कलरचा मस्कारा लावावा. रात्रीसाठी लिपस्टिकच्या कॉपर, गडद तांबडा, जांभळा अथवा डार्क मरुन अथवा कॉफी कलरच्या शेड्स चांगल्या दिसतात. कुठल्याही पार्टीसाठी जाताना बरोबर टिश्यूपेपर ठेवावा. यामुळे मेकअप खराब झाला तर तिथल्या तिथे नीटनेटका करता येतो.

## संयम ठेव, प्रश्न सुटेल

समुपदेशन

मी पस्तीस वर्षांची विवाहिता असून एका मुलीची आई आहे. माझी मुलगी सहा वर्षांची आहे. माझ्या पतीला आणखी एक अपत्य हवं आहे. मलाही त्याचा हा विचार मान्य आहे. पण आणखी एका मुलाला जन्म देण्यापेक्षा एखाद्या निराधार मुलाला दत्तक घ्यावं असं मला वाटतं. त्यानिमित्ताने आमचं कुटुंबही चौकोनी होईल आणि एका जीवाला हक्काचं घर मिळेल. पण पतीला हे विचार मान्य नाहीत. त्याला कसं समजावू हेच समजत नाहीये.

– सखी, तुझा विचार



अत्यंत स्तुत्य आहे. देशात निराधार बालकांची संख्या प्रचंड असताना प्रत्येक दांपत्याने हा विचार केला तर समस्येचं गांभीर्य कमी होण्यास मदतच होणार आहे. पण पारंपरिक विचारांचा पगडा असणारे लोक हा विचार झटक्यात स्वीकारु शकत नाहीत. त्यामुळे दुराग्रह न धरता त्याला समजावून सांगितलं, काही उदाहरणं दाखवली, त्याला अनाथांच्या आश्रमात नेऊन वस्तुस्थिती दाखवली आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या माणसांची ओळख करुन दिलीस तर कदाचित त्याचे विचार बदलू शकतील. त्यामुळे आधी हा प्रयत्न करुन बघ.

## जरा विसावू या वळणावर...

माय स्पेस

पती-पत्नीच्या नात्याची वीण विश्वासाच्या धाग्यांची असते. दोन अनोळखी माणसांमध्ये हे नाजूक नातं निर्माण होतं तेव्हा एकमेकांना समजून घेणं अभिप्रेत असतं. पण कधीकधी या नात्यात तणाव वाढतो आणि नाईलाजाने वीण उसवावी लागते. हा काळ दोघांच्याही दृष्टीने परीक्षा पाहणारा असतो. पण या कसोटीच्या काळातून स्वत:ला बाहेर काढून जगासमोर नव्याने सादर करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील अशा काही टिप्स...

✻ स्वत:साठी जगणं सुरूवात करा: एका नात्यामधून बाहेर पडणं म्हणजे संपूर्ण आयुष्याला पूर्णविराम नसतो. योग्य त्या वळणावर एक नवी सुरुवात करण्याचा प्रयत्न करावा लागतो. आतापर्यंत नातं सांभाळताना स्वत:ची तत्वं, आवडी-निवडी यांना फाटा देऊन जगला असाल तर ते विसरून जा. स्वत:च्या तत्वांवर जगण्याची मनाची तयारी करा.





✻ काही तरी शिका: आयुष्यातील प्रत्येक नातं काही ना काही शिकवत असतं. मागील नात्याकडूनही तुम्हाला काही चांगलं शिकायला मिळालं असेल तर जरूर शिका. पण चुका परत होणार नाहीत याची काळजी घ्या.

✻ एकटेपणाचं दु:ख नको: नात्यातून वेगळं झाल्यानंतर एकटं वाटणं स्वाभाविक आहे. पण त्याचं दु:ख नको. हे एकटेपण स्वत:ला ओळखण्याची नवी संधी आहे असं समजा. स्वत:वर प्रेम करायला शिका. यामुळे एकटेपणा जाणवणार नाही.

## बाल साहित्यिक व्हायचं तर...

स्कील डेव्हलपमेंट

तुम्ही चांगलं लिहू शकता. त्यातही लहान मुलांसाठी लेखन करायला तुम्हाला आवडतं. मुलांसाठी एखादं पुस्तक लिहायचा विचार तुमच्या मनात घोळतोय. मात्र छोट्यांची पुस्तकं लिहिणं खूप सोपं असतं असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. खरं तर प्रौढांपेक्षा लहान मुलांना खिळवून ठेवणं हे खूप मोठं आव्हान असतं. त्यांच्याकडे मनोरंजनाचे अनेक पर्याय असतात. त्यातच सध्याचा काळ तंत्रज्ञानाचा असल्याने मुलांसाठी खूप विचारपूर्वक लिहायला हवं. छोट्यांसाठी लिहिण्याची सुरुवात करण्याआधी नेमकं काय करायला हवं याविषयी...



✻ तुम्हाला मुलांसाठी का लिहावंसं वाटतं हे आधी ठरवून घ्या. लहान मुलांसाठी लिहिताना जबाबदारीचं भान असायला हवं. आपलं लेखन त्यांचं व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं, हे कायम लक्षात ठेवा. तुमचा प्रत्येक शब्द त्यांच्यावर प्रभाव पाडणारा असतो. त्यामुळे लेखनाचं कारण स्पष्ट झालं की त्या दृष्टीने प्रयत्न करणं सोपं होईल.

✻ लहान मुलांशी संवाद साधा. त्यांचं भावविश्व समजून घ्या. कुटुंबातल्या तसंच आजूबाजूच्या मुलांमध्ये मिसळा. तुमच्या भावी वाचकांकडूनच तुम्हाला लेखनविषयक मार्गदर्शन मिळेल.

✻ तुम्ही कोणत्या वयोगटातल्या मुलांसाठी लेखन करणार आहात हे ठरवून घ्या. प्रत्येक वयोगटाची आवड निवड वेगळी असते. गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे लेखनाची दिशा ठरवणं सोपं जाईल.

✻ भाषेकडे लक्ष द्या. उगाचच अवघड शब्दांचा वापर करू नका. मुलांना छोटी, साधी, सोपी वाक्य आवडतात. त्यामुळे उगाचच लांबलचक लिहिण्याचा प्रयत्न करू नका.

✻ पुस्तक लिहून पूर्ण झाल्यानंतर ते प्रकाशित करण्याचं आव्हान खूप मोठं असतं. आपली हस्तलिखितं घेऊन प्रकाशकांना भेटा. लहान मुलांची पुस्तक प्रकाशित करणाऱ्या प्रकाशन संस्था असतात. त्यांच्याशी संपर्क साधा.

✻ आपलं पुस्तक स्वत:च प्रकाशित करण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे. मात्र यासाठी बरंच संशोधन आणि मेहनत घ्यावी लागेल. भांडवल गुंतवावं लागेल. सगळ्याचा सारासार विचार करून मगच प्रकाशनाबाबत निर्णय घ्या.

## रफल साड्यांनी खुलवा लूक

स्टाईल स्टेटमेंट

पैठणी, कांजीवरम, बनारसी अशा पारंपरिक साड्यांमध्ये महिलांचं सौंदर्य खुलत असलं तरी सध्या मॉडर्न, इंडो-वेस्टर्न लूक देणाऱ्या साड्यांची बरीच चलती आहे. मूळ संकल्पना कायम ठेवत साडीला ट्विस्ट देण्याचे बरेच प्रयत्न झाले. मधल्या काळात लेहंगा साडीची बरीच चलती होती. धोती स्टाईल,पँट स्टाईल साडीही चर्चेत होती. आता रफल साड्यांचा ट्रेंड आहे. बॉलिवूडमधल्या बऱ्याच अभिनेत्री ही साडी कॅरी करताना दिसतात. रफल साडी खूप स्टायलिश दिसते. नव्या जमान्याच्या नवरीसाठीही 'इंडो-वेस्टर्न' स्टाईलची ही साडी बेस्ट ठरते. ही साडी स्टाईल करण्याच्या या काही टिप्स...

✻ रफल साडी प्लेन,डिझायनर, प्रिंटेड अशा विविध प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. रफल साडीवर बेल्ट लावल्याने तिचा लूक अधिकच खुलतो. कोणत्याही प्रकारच्या साडीवर बेल्ट लावता येईल.

✻ लग्नाआधीच्या समारंभांसाठी फ्रीलवाली रफल साडी चांगला पर्याय ठरेल. साडीचा हा प्रकार कोणत्याही ऑकेजनला चालून जाईल.

✻ इव्हिनिंग गाउन स्टाईल रफल साडीही खूप छान दिसते. रिसेप्शनला ही साडी नेसता येईल. काहीतरी वेगळं कॅरी करायचं समाधान यामुळे मिळू शकेल. अशा साडीवर पारदर्शक ब्लाउज घाला.

✻ कमी वजनाच्या रफल साड्याही खूप आरामदायी असतात. त्या तुम्हाला हटके लूकही मिळवून देतात.

✻ लेहंगा स्टाईल रफल साडी हा प्रकार मेहंदी, संगीत सोहळ्याची शान ठरेल.

✻ यासोबतच स्ट्राईप्ड प्रिंट, रफल पदराची , फ्लोरल प्रिंटेड रफल साड्यांचे पर्यायही आहेत.

## At a Glance

### राजस्थानमध्ये ढगाळ हवामान

**जयपूर :** राजस्थानच्या अनेक भागात ढगाळ वातावरण आणि पूर्व भागात काही ठिकाणी रिमझिम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. गेल्या चोवीस तासांत तापमानात दोन ते चार अंशांची वाढ नोंदविण्यात आली आहे

### नारायणपूरमध्ये २९ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**नारायणपूर :** छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात बुधवारी सात महिलांसह २९ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. माओवाद्यांच्या कुतुल एरिया कमिटीशी संबंधित कार्यकर्त्यांनी पोकळ माओवादी विचारसरणी आणि प्रतिबंधित संघटनेतील वाढत्या अंतर्गत मतभेदांमुळे निराशा व्यक्त करत पोलिस, सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि इंडो तिबेटीयन बॉर्डर पोलिस (आयटीबीपी) अधिकाऱ्यांसमोर स्वत:ला हजर केले

### केरळ सरकारने विरोधकांचे आरोप फेटाळले

**तिरुवनंतपुरम :** केरळ सरकारने पलक्कडमधील मद्यनिर्मिती प्रकल्पांच्या वाटपाबाबत विरोधी यूडीएफने केलेले आरोप बुधवारी स्पष्टपणे फेटाळून लावले. सरकारने स्पष्ट केले की, या प्रकरणाशी संबंधित कॅबिनेट नोट गोपनीय नसून अनेक दिवसांपासून अधिकृत सरकारी वेबसाइटवर सार्वजनिकरित्या उपलब्ध आहे.

# डीपसीकच्या मर्यादा झाल्या उघड

## चिनी एआय प्लॅटफॉर्म : उत्तरे देण्यास अडखळला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चीनी एआयडीपसीक:चीनच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) डीपसीकने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. अमेरिकन आयटी कंपन्यांचे समभाग कोसळले आहेत आणि डीपसीक चॅट जीपीटीसारख्या लोकप्रिय एआयशी स्पर्धा करीत आहे. मात्र, लोकप्रियतेनंतर काही दिवसांतच चिनी कंपनी टिकटॉकप्रमाणेच डीपसेकवरही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. खरं तर या एआय प्लॅटफॉर्मवर जेव्हा लोकांनी चीनमधील उइगर मुस्लिमांसह ड्रॅगनच्या सभोवतालच्या मुद्द्यांवर प्रश्न विचारले तेव्हा त्याचे बोलणे थांबले आणि वापरकर्त्यांना अचूक उत्तरे मिळू शकली नाहीत, ज्यामुळे चीनचाही पर्दाफाश झाला.

माध्यमातील वृत्तानुसार, मानवाधिकार कार्यकर्ते आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी चीनच्या नव्याने विकसित केलेल्या एआय प्लॅटफॉर्म डीपसेकवर जोरदार टीका केली आहे. सरकारचा प्रचार, संवेदनशील विषयांवरील सेन्सॉरशिप आणि वैयक्तिक माहिती गोळा करण्याच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. हा एआय उइगर, तियानमेन स्क्वेअर हत्याकांड आणि तैवानच्या परतीच्या आवाहनाशी संबंधित मुद्द्यांना सेन्सॉर करताना दिसतो. लोकांनी याबाबत प्रश्न विचारले असता योग्य उत्तर मिळू शकले नाही, कारण चीनचा पर्दाफाश होण्याची भीती होती. याशिवाय वैयक्तिक डेटा, आयपी अॅड्रेस, चॅट हिस्ट्री उघडपणे गोळा केल्याचा आरोपही या अॅपवर करण्यात आला आहे. कॅम्पेन फॉर उइगर्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील आपल्या एका पोस्टमध्ये डीपसीकबद्दल हा दावा केला आहे.

जेव्हा चीनवर उइगर मुस्लिमांवर मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याचा आरोप झाला, तेव्हा डीपसीकने विचित्र उत्तरे दिली. उइगर कोण आहेत आणि चीनमध्ये राहणाऱ्या लोकांबद्दल तुम्ही मला काय सांगाल? असे विचारले असता, डीपसीक यांनी वांशिक गटांचा इतिहास, संस्कृती आणि चीन सरकारकडून त्यांना मिळणारी वागणूक याविषयी च्या वादांवर थोडक्यात उत्तर दिले, परंतु नंतर ते उत्तर डिलीट केले आणि वापरकर्त्यांना दुसर्या विषयावर चर्चा करण्यास सांगितले. एआयने लिहिले, "माफ करा, हे माझ्या सध्याच्या कार्यक्षेत्राबाहेर आहे. आपण आणखी एका गोष्टीबद्दल बोलूया. १९८९ च्या तियानमेन चौकातील निदर्शने आणि नरसंहाराबद्दल विचारले असता डीपसीकने असेच उत्तर दिले.




### डीपसेक हे चिनी प्रचाराचे मुखपत्र

● स्वित्झर्लंडमधील डिजिटल कायदा तज्ज्ञ जान झारनोकी यांनी एक्सवर डीपसेकशी आपला अनुभव शेअर केला. झारनोकी म्हणाले, 'डीपसीक तांत्रिकदृष्ट्या मोठे यश मिळवू शकते, परंतु हे चिनी प्रचाराचे मुखपत्र देखील आहे. शिनजियांगमधील चीनच्या कारवायांना नरसंहार आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार मानवतेविरुद्धचे गुन्हे म्हणून स्वीकारण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सला कसे पटवून देण्याचा प्रयत्न केला, हे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, जेव्हा जेव्हा त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला, तेव्हा डीपसीक एआयने या प्रश्नाचे समर्थन करता येणार नाही, असे सांगून अचानक उत्तर देणे बंद केले. झारनोकी म्हणाले की, शिनजियांगबद्दल एआयने दिलेली प्रतिक्रिया खूप स्क्रिप्टेड होती आणि चिनी प्रचाराचा साचा म्हणून त्याचे वर्णन केले.

### ● चिनी अॅप्सना कलंकित होण्याचा इतिहास...

चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या (सीसीपी) सरकारवर यापूर्वी अनेक अॅप्सच्या माध्यमातून जगभरातील देशांवर नजर ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे. भारत सरकारनेही देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने टिकटॉकसह अशा अनेक अॅप्सवर बंदी घातली होती, त्यानंतर गुगल प्ले स्टोअर आणि अॅपल अॅप स्टोअरमधूनही ते हटवण्यात आले होते. चीनचे जिनपिंग सरकार मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या इतिहासासाठी ओळखले जाते. कॅम्पेन फॉर उइगुर्सचे कार्यकारी संचालक रुशान अब्बास यांनी सोशल मीडियावर या प्लॅटफॉर्मचा निषेध करताना म्हटले आहे की, "हे संवेदनशील डेटा गोळा करते ज्यामुळे मानवी हक्कांच्या उल्लंघनासाठी ओळखल्या जाणार्या सीसीपीला फायदा होईल." चिनी एआय प्लॅटफॉर्म आणि अॅप्स डिजिटल आंतरराष्ट्रीय दडपशाहीसह धोक्यांना प्रोत्साहन देतात. त्याकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही."

# इथेनॉलच्या किंमती वाढवण्यास परवानगी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पर्यावरण

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने अर्थसंकल्पापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पेट्रोलमध्ये मिश्रीत केल्या जाणाऱ्या इथेनॉलच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. पूर्वी सरकारी कंपन्या ५६.५८ रुपये प्रति लिटर दराने इथेनॉल खरेदी करायच्या. आता तेच इथेनॉल ५७.९७ रुपये प्रति लिटर दराने खरेदी केले जाईल. म्हणजेच इथेनॉलच्या किंमतीत ३ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. याचा थेट फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती देताना केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, सरकारने इथेनॉलसाठी नवीन दर निश्चित केले आहेत. उसाच्या रसापासून तयार होणाऱ्या इथेनॉलची किंमत प्रति लिटर ६५.६१ रुपये, बी-हेवी गुळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलची प्रति लिटर ६०.७३ रुपये आणि सी-हेवी गुळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलची किंमत प्रति लिटर ५७.९७ रुपये असेल. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे इथेनॉल पुरवठादारांना किंमत स्थिरता आणि किफायतशीर किमती प्रदान करण्याचे धोरण सुरू ठेवण्यास सरकारला मदत होईल, असे वैष्णव म्हणाले. शिवाय कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास, परकीय चलन वाचवण्यास आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यास देखील मदत होईल, असे ते म्हणाले.

### पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रीत करण्याचे लक्ष्य

● अश्विनी वैष्णव म्हणाले की, केंद्र सरकारने २०३० च्या ऐवजी २०२५-२६ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रीत करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. तेल कंपन्यांनी २०२४-२५ दरम्यान १८ टक्के मिश्रणाचे लक्ष्य साध्य करण्याची योजना आखली आहे. ते म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत (३१ डिसेंबर २०२४ पर्यंत), सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसी) पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यामुळे १,१३,००७ कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय चलनाची बचत झाली आहे. अंदाजे १९३ लाख मेट्रिक टन कच्च्या तेलाच्या ऐवजी इथेनॉल मिश्रित तेलाचा वापर करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

# राष्ट्रवादी काँग्रेस दिल्लीच्या रणांगणात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत आपले नशीब आजमवण्यासाठी मैदानात उतरले आहेत. कोणत्याही पक्षाची युती न करता अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष दिल्ली विधानसभा निवडणुकीत ३० जागांवर निवडणूक लढणार आहेत.

विशेष गोष्ट म्हणजे, अजित पवारांचा पक्ष महाराष्ट्रात भाजपसोबत सत्तेवर आहे. परंतु, त्यांच्या पक्षाने दिल्लीत भाजपाशी हातमिळवणी केलेली नाही. २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने ५ जागांवर निवडणुका लढवल्या होत्या. परंतु एनसीपीला



एकाही जागा जिंकण्यात यश मिळू शकले नव्हते. त्यावेळी एनसीपीचे नेतृत्व शरद पवार करत होते.

अजित पवार यांच्या एनसीपीने बुराडीमधून रत्न त्यागी, बादलीमधून मुलायम सिंह, रिठालामधून लखन प्रजापति, मंगोलपुरीमधून खेम चंद, चांदनी चौकमधून खालिद उर रहमान यांना उमेदवारी दिली आहे. याशिवाय मटिया महलमधून मो जावेद, बल्लीमारानमधून हरुन, मोती नगमधून सादरे आलम, मादीपुरमधून हरीश कुमार, हरिनगरमधून शाबिर खान, जनकपुरीमधून मोहम्मद नवीन आणि विकासपुरीमधून हामिद यांना उमेदवारी दिली आहे.

त्याच वेळी, नवी दिल्ली मधून एनसीपीने येथील विश्वनाथ अग्रवाल, कस्तूरबा नगरमधून सुरेंद्र सिंह हुड्डा, मालवीय नगरमधून समीर, छत्तरपुरमधून नरेंद्र तंवर, देवलीमधून खेमचंद राजौरा, संगम विहारमधून कमर अहमद, कालका जीमधून जामिल, तुगलकाबादमधून प्रेम खताना, बदरपुरमधून इमरान सैफी, लक्ष्मीनगरमधून नामा, कृष्णनगरमधून दानिश अली, शाहदरामधून राजेंद्र पाल, सीमापुरीमधून राजेश लोहिया, रोहतास नगरमधून अभिषेक, घोण्डामधून मेहक डोगरा, गोकुलपुरमधून जगदीश भगत आणि करावल नगरमधून संजय मिश्रा निवडणुकीच्या रंगणात उतरले आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने जोरदार तयारी केली आहे. पक्षाचे नेते आणि माजी आमदार झीशान सिद्दीकी ३० आणि ३१ जानेवारी रोजी दिल्लीत एनसीपी उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचार करणार आहेत. यावेळी पार्थ पवार देखील प्रचार रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. एनसीपीला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. दिल्लीतील सर्व ७० विधानसभा जागांवर ५ फेब्रुवारी रोजी एका टप्प्यात मतदान होणार आहे. त्याच वेळी, निवडणुकीचे निकाल ८ फेब्रुवारी रोजी घोषित केले जातील.

# विद्यार्थ्यांच्या चित्रपटगृहातील प्रवेशावर मर्यादा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**हैद्राबाद :** तेलंगणामध्ये १६ वर्षांखालील मुले रात्री ११ नंतर थिएटरमध्ये चित्रपट पाहू शकणार नाहीत. तेलंगणा उच्च न्यायालयाने राज्य सरकारला या संदर्भात निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च न्यायालयाने तेलंगणा सरकारला प्रथम सर्व संबंधित पक्षांशी सल्लामसलत करण्याचे निर्देश दिले. यानंतर, १६ वर्षांखालील मुलांना सकाळी ११ वाजण्यापूर्वी आणि रात्री ११ वाजल्यानंतर थिएटर/मल्टीप्लेक्समध्ये प्रवेश प्रतिबंधित करण्याचे निर्देश जारी करावेत असे सांगितले आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की, जोपर्यंत असा निर्णय होत नाही तोपर्यंत, प्रतिवादी १६ वर्षांपेक्षा



कमी वयाच्या मुलांना रात्री ११ नंतर चित्रपट पाहू देणार नाहीत. राम चरण अभिनीत गेम चेंजर आणि इतर चित्रपटांच्या तिकिटांच्या किमतींमध्ये वाढ करण्याशी संबंधित याचिकांवर सोमवारी उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. या वेळी हे निर्देश देण्यात आले.

याचिकाकर्ता विजय गोपाल यांचे वकील यांनी त्यांच्या युक्तिवादात म्हटले आहे की, अल्पवयीन मुलांना रात्री उशिरा चित्रपट पाहण्याची परवानगी देऊ नये, कारण त्याचा त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. ते म्हणाले की, मल्टिप्लेक्समधील शेवटचा शो पहाटे १.३० वाजेपर्यंत चालतो आणि रात्री उशिरा होणाऱ्या शोमध्ये अल्पवयीन मुलांच्या थिएटरमध्ये प्रवेशावर कोणतेही निर्बंध नाहीत. तसेच, सरकारने अल्पवयीन मुलांच्या थिएटरमध्ये प्रवेशाचे नियमन करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, असेही ते म्हणाले. तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी निर्णय घ्यायला हवे होते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये संध्या थिएटरमध्ये पुष्पा २ च्या प्रदर्शनादरम्यान चेंगराचेंगरी झाली होती. या घटनेत एका अल्पवयीन मुलाला गंभीर दुखापत झाली आणि त्याच्या आईचा मृत्यू झाला.

# सैफ अली खान हल्ला प्रकरणी आरोपीला न्यायालयीन कोठडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्या घरातील चोरी आणि हल्ला प्रकरणातील आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजादला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे. आरोपीला वांद्रे येथील महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. आरोपीला २९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. ती आज संपल्यानं त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलिसांतर्फे, आरोपीकडून आणखी माहिती मिळवण्यासाठी आरोपीला आणखी दोन दिवस पोलीस कोठडी देण्याची मागणी केली. मात्र,आरोपी दहा दिवस पोलीस कोठडीत होता.



याकडे न्यायालयानं लक्ष वेधलं आणि आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एक टीम कोलकाता येथे पाठवली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीनं हुशारीनं गुन्हा करण्यापूर्वी रेकी आणि पूर्व तयारी केली आहे. त्याचा आणखी साथीदार असल्याचा संशय आहे. याबाबत अधिक तपास करायचा आहे. त्यामुळे दोन दिवस पोलीस कोठडी वाढवून मिळावी, अशी मागणी पोलिसांतर्फे करण्यात आली.

## गाझा पट्टीकडे परतताना

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**गाझा :** इस्रायल-हमास रक्तरंजित संघर्षात इस्रायलच्या आदेशानुसार दक्षिणेकडे विस्थापित झालेले पॅलेस्टिनी, युद्धविरामानंतर, उत्तर गाझामधील त्यांच्या घरी परतत आहेत.

# तिहेरी तलाकसंबंधात न्यायालयाची विचारणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मुस्लिम महिला (विवाह हक्क संरक्षण) कायद्याचे उल्लंघन करून किती मुस्लीम पुरुषांनी तिहेरी तलाक देऊन पत्नीशी संबंध तोडले आहेत, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. देशभरात त्यांच्याविरोधात किती एफआयआर आणि आरोपपत्र दाखल झाले, याची माहिती द्या. तसेच उच्च न्यायालयात तीन घटस्फोटांशी संबंधित प्रलंबित प्रकरणांची माहिती देण्यास सांगितले आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने या कायद्याच्या घटनात्मकतेला आव्हान देणाऱ्या



१२ याचिकांवर सुनावणी करताना केंद्र आणि इतर पक्षकारांना या याचिकांवर लेखी निवेदन सादर करण्यास सांगितले आहे. खंडपीठाने आता या याचिकांवर अंतिम सुनावणी १७ मार्चपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात निश्चित केली आहे. कोझिकोड येथील मुस्लिम संघटना 'समस्थ केरळ जमियत-उल-उलेमा' या प्रकरणात मुख्य याचिकाकर्ते आहेत.

# मनोज जरांगे पाटील यांची सरकारला मुदत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करणार आहे की नाही हे मुख्यमंत्र्यांनी संध्याकाळ पर्यंत सांगून टाकावं असं अल्टिमेटम मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलंय. ते उपोषणस्थळी पत्रकारांशी बोलत होते. मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केलं आहे की त्यांनी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण कराव्यात.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्हाला जीव जाळायला लावू नका. तुम्ही मागण्या पूर्ण करणार नसाल तर आम्ही उपोषण सोडून वेगळ्या मार्गानं आंदोलन करू.



आम्हाला उपोषणाला बसावं लागेल असं वाटलं नव्हत, अशी खंतही जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. तुम्ही मराठ्यांना सुखाने खाऊ दिलं नाही तर आम्ही तुम्हाला 5 वर्ष सुखाने खाऊ देणार नाही असा इशाराही जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला. मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण होतील असं वाटलं होतं. तसंच आम्हाला उपोषणाला बसावं लागेल असं वाटलं नव्हत अशी खंत देखील जरांगेंनी व्यक्त केलीय.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्ताग्रहण करताच पाकला धक्का

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या आदेशानंतर पाकिस्तानला मिळणारी सर्व परकीय मदत बंद झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानात सुरू असलेले अनेक महत्त्वाचे प्रकल्प रखडले आहेत. एका मीडिया रिपोर्टनुसार, डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने पाकिस्तानला मिळालेल्या मदतीचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आढावा होईपर्यंत ही बंदी कायम राहणार आहे. या निर्णयामुळे युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटकडून (यूएसएआयडी) पाकिस्तानात सुरू असलेले प्रकल्प रखडले आहेत. याशिवाय ॲम्बेसेडर फंड फॉर कल्चरल प्रिझर्व्हेशनतर्फे सुरू असलेले प्रकल्पही रखडले आहेत.

त्याअंतर्गत पाकिस्तानात असलेल्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याचे काम सुरू होते. जिओ न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, हा निधी पाकिस्तानातील ऐतिहासिक वास्तूंच्या जतन आणि देखभालीसाठी काम करतो. कराचीतील अमेरिकन वाणिज्य दूतावासानेही ही माहिती दिली आहे. पाकिस्तानला मिळालेल्या मदतीचा



ट्रम्प प्रशासन आढावा घेत आहे. अशा परिस्थितीत आढावा होईपर्यंत मदत थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे पाकिस्तानात अमेरिकेच्या मदतीने सुरू असलेले ऊर्जा क्षेत्रातील ५ प्रकल्प बंद झाले आहेत. यातील एक प्रकल्प पाकिस्तानातील हवामान वित्तपुरवठा उपक्रम आहे आणि दुसरा कार्यक्रम स्वच्छ ऊर्जेशी संबंधित आहे.

एवढेच नव्हे तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे ४ प्रकल्पही बंद करण्यात आले आहेत. यापैकी एक सामाजिक संरक्षण उपक्रम कार्यक्रम २०२५ च्या अखेरीस संपणार होता. आरोग्य, शेती, उपजीविका, अन्नसुरक्षा, पूर, हवामान आणि शिक्षणाशी संबंधित अनेक प्रकल्पांनाही अमेरिकेच्या या निर्णयामुळे धोका निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या या आदेशामुळे प्रशासन, मानवी हक्कांशी संबंधित प्रकल्पांसाठी निधीची कमतरता भासण्याची शक्यता आहे. जिओ न्यूजचे म्हणणे आहे की, काही प्रकल्प कायमचे बंद होऊ शकतात. अमेरिकेच्या मदतीने किती पैशांचे प्रकल्प रखडले आहेत, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. पण याचा परिणाम पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवरही होणार हे स्पष्ट आहे. अमेरिका फर्स्ट धोरणाबद्दल बोलणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना परदेशात खर्च होणाऱ्या रकमेवर नियंत्रण ठेवायचे आहे.

आयएमएफ, जागतिक बँकेसह अनेक संस्थांकडून सातत्याने कर्ज घेणाऱ्या पाकिस्तानसाठी हा धक्का आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेसमोर नवा धक्का आता डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस यांनी कोणत्याही देशाचे नाव न घेता सांगितले की, ट्रम्प प्रशासन परदेशी मदतीचा आढावा घेणार आहे.



**इंग्लंडचा खेळ पाहून अश्विनची टीका**

**“आक्रमक क्रिकेट खेळणे आणि बेफिकीर क्रिकेट खेळणे यात खूप बारीक रेषा आहे,” असे आर अश्विनने एक्सवर इंग्लंडच्या डावाच्या मध्यावर पोस्ट केली होती. अश्विनचा स्पष्ट अर्थ असा होता की, आक्रमक क्रिकेट खेळण्याऐवजी तुम्ही बेफिकीर क्रिकेट खेळत नाही, याकडे लक्ष द्या, कारण इंग्लंड संघाचा प्रत्येक फलंदाज फक्त मोठे फटके खेळण्याचा प्रयत्न करत होता. ते कोणत्याही गोलंदाजाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करत असले तरी, तुम्हाला सामन्याची परिस्थिती आणि गोलंदाजी समजून घ्यावी लागेल, तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता.**

# श्रीवल्ली, सहजा यांची आगेकूच

## डेक्कन जिमखाना आयटीएफ ७५,००० डॉलर महिला टेनिस स्पर्धा

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** डेक्कन जिमखाना यांच्या वतीने आयोजित नॅशनल एग कॉर्डीनेशन कमिटी(एनइसीसी) यांनी प्रायोजित केलेल्या व आयटीएफ, एआयटीए आणि एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली 24व्या एनइसीसी डेक्कन जिमखाना आयटीएफ 75,000डॉलर महिला टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये पहिल्या फेरीत एकेरीत भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती, सहजा यमलापल्ली यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.





डेक्कन जिमखाना टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये एकेरीत पहिल्या फेरीत भारताच्या वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने अमेरिकेच्या एलाना स्मिथचा 6-1, 6-2 असा सहज पराभव करून दुसरी फेरी गाठली. हा सामना 1 तास 20 मिनिटे चालला. सामन्यात पहिल्या सेटमध्ये श्रीवल्लीने जोरदार खेळ करत चौथ्या गेममध्ये स्मिथची सर्व्हिस भेदली. या सेटमध्ये आपले वर्चस्व कायम राखत हा सेट 6-1 असा सहज जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये स्मिथने श्रीवल्लीची तिसऱ्या गेममध्ये सर्व्हिस रोखली व 2-1 अशी आघाडी घेतली. पण हि आघाडी तिला फार काळ टिकवता आली नाही. पुढच्याच गेममध्ये श्रीवल्लीने स्मिथची सर्व्हिस ब्रेक केली व सामन्यात बरोबरी साधली. त्यानंतर श्रीवल्लीने आपल्या बिनतोड सर्व्हिस व आक्रमक खेळाच्या जोरावर हा सेट स्मिथविरुद्ध 6-2 असा जिंकून विजय मिळवला.

संघर्षपूर्ण लढतीत वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या सहजा यमलापल्लीने क्वालिफायर जपानच्या नाहो सातोचा टायब्रेकमध्ये 6-7(4), 6-1, 6-3 असा पराभव करून दुसऱ्या फेरीत धडक मारली. सहजा हिने सातोचे आव्हान 2 तास 35 मिनिटात मोडीत काढले. पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या चीनच्या फँग्रेन टीयान हिने भारताच्या वैष्णवी आडकरचा 6-3, 6-4 असा पराभव केला. अन्य लढतीत इटलीच्या कॅमिला रोसाटेल्लो हिने चेक प्रजासत्ताकच्या सारा बेजलेकचा 3-6, 1-6, 6-4 असा तीन सेटमध्ये पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. दुहेरीत पहिल्या फेरीत भारताच्या ऋतुजा भोसले हिने ग्रेट ब्रिटनच्या ॲलिसिया बार्नेटच्या साथीत तिसऱ्या मानांकित स्लोव्हाकियाच्या दलिला जाकुपोविक व ब्राझीलच्या लॉरा पिगोस्सीचा 6-7(5), 6-4, [10-4] असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली.

## मुंबई रणजी संघात डोंबिवलीच्या श्रेयस गुरवची निवड

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** मुंबई रणजी संघात डोंबिवली मधील क्रिकेटपटू श्रेयस गुरव याची निवड झाली आहे. वयाच्या 10 व्या वर्षापासून श्रेयसने क्रिकेट प्रशिक्षक राजन धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेटचा सराव करण्यास सुरुवात केली. श्रेयस हा उत्कृष्ट स्पीनर गोलंदाज असून गेल्या वर्षभरात त्याने 84 फलंदाजांच्या दांड्या गुल केल्या आहेत. रणजी संघात त्याची निवड झाल्याने प्रशिक्षक धोत्रे व सहकाऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे.

मुंबई रणजी संघात निवड झालेला श्रेयस गुरव हा डोंबिवली पूर्वेतील सारस्वत कॉलनीमध्ये रहातो. स. वा. जोशी शाळेचे ते विद्यार्थी आहेत. बालपणापासून श्रेयस यांना क्रिकेट खेळण्याची आवड होती. इयत्ता चौथीमध्ये असल्यापासून श्रेयस यांनी डोंबिवलीतील क्रिकेट प्रशिक्षक राजन धोत्रे यांच्याकडे क्रिकेट प्रशिक्षणाला सुरूवात केली. या प्रशिक्षणातून श्रेयस यांना क्रिकेटमधील अष्टपैलु खेळाचे मार्गदर्शन मिळाले. अथक मेहनत, कष्ट करण्याची तयारी या सर्व गुणांवर मात करत श्रेयस यांनी रणजी निवडीचा मोलाचा पल्ला गाठला, असे प्रशिक्षक धोत्रे यांनी सांगितले.

## फायटर्स इलेव्हन, बीअ स्पोर्ट अकादमी अ संघ उपांत्य फेरीत





**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 13 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत फायटर्स इलेव्हन क्रिकेट क्लब, बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी अ या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत विरेन पाटील(73धावा व 3-5) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर फायटर्स इलेव्हन क्रिकेट क्लब संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाचा 243 धावांनी धुव्वा उडवत उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या लढतीत उर्शिता संशी नाबाद 169धावा) हीने केलेल्या धडाकेबाज फलंदाजीसह धनंजय कुमार(5-11)याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी अ संघाने वेदिक फिट क्रिकेट क्लब संघावर 266 धावांनी दणदणीत विजय मिळवला.

## टी-२० मध्ये इंग्लंडने भारताचा २६ धावांनी केला पराभव




**राजकोट :** इंग्लंडने तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताचा २६ धावांनी पराभव केला आहे. राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियमवर भारताने गोलंदाजीची निवड केली. इंग्लंडने ९ गडी गमावून १७१ धावा केल्या. वरुण चक्रवर्तीने ५ बळी घेतले. प्रत्युत्तरात टीम इंडियाला ९ गडी गमावून केवळ १४५ धावा करता आल्या. इंग्लंडकडून बेन डकेटने अर्धशतक केले. लियाम लिव्हिंगस्टनने ४३ आणि जोस बटलरने २४ धावा केल्या. भारताकडून हार्दिक पांड्याने ४० आणि अभिषेक शर्माने २४ धावा केल्या. इंग्लंडकडून जेमी ओव्हरटनने ३, जोफ्रा आर्चर आणि ब्रायडन कार्सने प्रत्येकी २ बळी घेतले.

## मेट्रो क्रिकेट क्लब व कॅडेन्स यांच्यात विजेतेपदासाठी लढत

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पाथ-वे फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत डावखुरा फिरकीपटू वरुण चौधरी(5-23) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर मेट्रो क्रिकेट क्लब संघाने अँबिशियस क्रिकेट क्लबचा 18 धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.



गोलंदाजी करत मेट्रो क्रिकेट क्लबला 127धावावर रोखले.

बारणे क्रिकेट मैदानावर झालेल्या या उपांत्य फेरीच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना मेट्रो क्रिकेट क्लब संघाला 28 षटकात सर्वबाद 127धावाच करता आल्या. यात साहिल एन 36, सोहम शिंदे 25, नचिकेत वेर्लेकर 14, विघ्नेश पाटील नाबाद 13 यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. अँबिशियस क्रिकेट क्लबकडून गौरव जोशी(3-37), संकेत यशवंते(3-32), शुभम शेवाळे(2- 21) यांनी सुरेख गोलंदाजी करत मेट्रो क्रिकेट क्लबला 127धावावर रोखले.

127धावाचे आव्हान अँबिशियस क्रिकेट क्लब संघ पेलू शकला नाही. त्यांचा डाव 26.3 षटकात सर्वबाद 109धावावर कोसळला. यात श्रेयस जाधव 26, शुभम शेवाळे 26, हर्षल हाडके 11, वरद रणनवरे 10 यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. मेट्रो क्रिकेट क्लबकडून वरुण चौधरीने 23 धावात 5 गडी बाद करून अँबिशियसचा निम्मा संघ तंबूत परत पाठवला.

# रोटरी क्लब ऑफ पुणे तर्फे ‘द अल्टिमेट मूव्ह-ए-थॉन’ स्पर्धेचे ९ फेब्रुवारी रोजी आयोजन !

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** रोटरी क्लब ऑफ पुणे तर्फे चालणे, पळणे आणि सायकल चालवणे अशा तीन वेगवेगळ्या गोष्टींचा संगम असलेल्या ‘द अल्टिमेट मूव्ह-ए-थॉन’ स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. शिवाजीनगर येथील बीएमसीसी महाविद्यालय येथून या स्पर्धेला रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ४: वाजता प्रारंभ होणार आहे.



पत्रकार परिषदेमध्ये याबाबत अधिक माहिती देताना ‘द अल्टिमेट मूव्ह-ए-थॉन’चे अध्यक्ष जयदीप पारेख, यांनी सांगितले की, मॅरेथॉन म्हणजेच पळणे, सायक्लोथॉन म्हणजेच सायकलवरून व्यायाम आणि वॉकेथॉन म्हणजेच चालणे, अशा तीन वेगवेगळ्या गोष्टींना एकत्रिपणे आणून ‘द अल्टिमेट मूव्ह-ए-थॉन’ उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाव्दारे समाजातील सर्व वयोगटातील लोकांना निरोगी जीवनशैली स्विकारण्यास तसेच स्वाथ्यपूर्ण अशा जीवनशैलीला प्रोत्साहित करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने समाजातील वंचित घटकांच्या फायद्यासाठी सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून (सीएसआर) आणि प्रायोजकत्व, देणग्याव्दारे ग्रामीण क्षेत्रातील तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांसाठी वैद्यकिय आणि शैक्षणिक गोष्टींसाठी निधी संकलित करण्याचे उद्दीष्ट आहे.

स्पर्धेतील सायक्लोथॉन आणि मॅरेथॉन ही १० कि.मी. आणि २१ कि.मी. अशा दोन गटात तर, वॉकेथॉन ही ३ कि.मी. आणि ५ कि.मी. अशा दोन गटात होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना टी-शर्ट, प्रशस्तीपत्रक, मेडल्स् आणि फुड-पॅकेट देण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी आणि नावनोंदणीसाठी ८९५६३९४२०२ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## रणजी करंडक- कोहलीची नेटमध्ये अर्धा तास फलंदाजी

**नवी दिल्ली :** भारतीय फलंदाज विराट कोहली 12 वर्षांनंतर रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. नोव्हेंबर 2012 नंतरच्या पहिल्या रणजी ट्रॉफी सामन्याआधी कोहली नेट्समध्ये घाम गाळला होता. आज बुधवारीही त्याने मैदानावर घाम गाळला. रणजी ट्रॉफी 2024-25 ची पुढील फेरी 30 जानेवारीपासून सुरू होणार आहे. यामध्ये कोहली दिल्लीकडून रेल्वेविरुद्ध खेळणार आहे. कोहली आज सकाळी 8 वाजता अरुण जेटली स्टेडियमवर पोहोचला. यानंतर त्याने एक तासापेक्षा जास्त वेळ जिममध्ये घालवला. त्यानंतर मैदानात येऊन त्याने खेळाडूंसोबत सराव केला. दरम्यान, कोहलीबाबत कर्णधार आयुष बडोनी म्हणाला, विराट भैय्याच्या आगमनाने सर्वजण प्रेरित आहेत.



## कला क्रीडा गुणांना वाव देणे आवश्यक : गिरीश प्रभुणे

**थेरगाव :** शालेय वयातील कलेचा संस्कार ही कलाकाराच्या घडणीची सुरुवात असते, त्यासाठी अभ्यासाबरोबरच कला आणि क्रीडा गुणांच्या वाढीसाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे." असे प्रतिपादन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी केले. थेरगाव शिक्षण संकुलातील कन्या शाळेने आयोजित केलेल्या दोन दिवसीय कला क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षिका अरुणा महानवर, मुख्याध्यापक श्रीकांत चौगुले, दिलीप थोरात, संतोष जंगम, नम्रता बेलकर आदी मान्यवर उपस्थित होते. नटराजाचे पूजन व क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मुलींनी सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार, साधन कवायत, योगासने, पिरॅमिड यांची प्रात्यक्षिके सादर केली. त्याला उपस्थितांनी उत्तम दाद दिली. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते चित्रकला व वैयक्तिक स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थीनींचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्रभुणे पुढे म्हणाले की " सध्या नामांकित खाजगी शाळांच्या बरोबरीला मनपाच्या शाळा आहेत. मात्र मनपा शाळेतील पालकांची शिक्षणाबद्दलची आस्था कमी असते ,त्यामुळे त्यांचे सहकार्य कमी मिळते. असे असतानाही शिक्षक सकारात्मकतेने प्रयत्न करत आहेत.

## सीए क्रिकेट लीग स्पर्धा : एमएसडी स्ट्रायकर्स, बीस्मार्ट संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** इन्स्टिट्युट ऑफ चार्टरड् अकाऊंटस् ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिझनल कौन्सील (डब्ल्युआयआरसी) पुणे शाखा तर्फे आयोजित १२ व्या ‘केके असोसिएट्स अँड डेन्टल डिझाईन करंडक’ सीए क्रिकेट लीग (सीएसीएल) २०२५ स्पर्धेत एमएसडी स्ट्रायकर्स आणि बीस्मार्ट या संघांनी अनुक्रमे व्हिएसएन सुपरकिंग्ज् आणि एमएसीए इलेव्हन संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला.



सहकारनगर येथील मैदानावर शिंदे हायस्कूल सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सम्यक पारख याने फटकावलेल्या नाबाद ४३ धावांच्या जोरावर बीस्मार्ट संघाने एमएसीए इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना एमएसीए इलेव्हनने ७६ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये सागर एस. (२० धावा), लोकेश नहार (नाबाद १३ धावा) आणि राजेश मेहता (१४ धावा) यांनी संघाच्या डावाला आकार दिला. साहील पारख आणि आयुष तिवारी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. हे आव्हान बीस्मार्ट संघाने ९.२ षटकात पूर्ण केले. सम्यक पारख याने २८ चेंडूत ३ चौकार आणि १ षटकारासह नाबाद ४३ धावांची खेळी करून संघाला एकहाती विजय मिळवून देत अंतिम फेरीत पोचवले.

सव्वा-दोनशेहून अधिक धावांचा पाऊस पडलेल्या सामन्यात आत्मन बागमार याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे एमएसडी स्ट्रायकर्स संघाने व्हिएसएन सुपरकिंग्ज् संघाचा ९ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या व्हिएसएन सुपरकिंग्ज्ने १० षटकात ११४ धावांचे मोठे लक्ष्य उभे केले होते. डावामध्ये अक्षय कोयले (३६ धावा), प्रविण नलावडे (२२ धावा) आणि यश बोरा (२१ धावा) यांनी उपयुक्त फटकेबाजी करून संघाला मोठी धावसंख्या गाठून दिली.

## ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा टेनिस संघ जाहीर

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** उत्तराखंड, देहरादून येथे होणाऱ्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा टेनिस संघ जाहीर करण्यात आला आहे. विविध वयोगटात राज्यातील गुणवान खेळाडू या स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

पुरुष व महिला सांघिक गट, एकेरी, दुहेरी आणि सांघिक स्पर्धेत महाराष्ट्र संघाचा समावेश असून अखिल भारतीय टेनिस संघटनेच्या कट ऑफ नियमानुसार हा संघ जाहीर करण्यात आला असल्याचे एमएसएलटीएचे मानद सचिव सुंदर अय्यर यांनी सांगितले.

पुरुष संघ: प्रसाद इंगळे, अनुप बंगार्गी, अर्णव पापरकर, संदेश कुरळे, निशित रहाणे, प्रशिक्षक: केतन धुमाळ, व्यवस्थापक: राजीव देसाई;

महिला संघ: ऋतुजा भोसले, वैष्णवी आडकर, आकांक्षा नित्तूरे, पूजा इंगळे, सोनल पाटील; प्रशिक्षक: ऋतुजा कुलकर्णी, व्यवस्थापक: शीतल भोसले;

महिला एकेरी व दुहेरी: ऋतुजा भोसले व वैष्णवी आडकर; मिश्र दुहेरी: अर्णव पापरकर व वैष्णवी आडकर; सांघिक पुरुष गट: प्रसाद इंगळे, अनुप बंगार्गी, अर्णव पापरकर, संदेश कुरळे, निशित रहाणे, सांघिक महिला गट: ऋतुजा भोसले, वैष्णवी आडकर, आकांक्षा नित्तूरे, पूजा इंगळे, सोनल पाटील;

**अंतिम सामन्याला ५००० नागरिकांची गर्दी**

# प्रजासत्ताक दिनी वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग–२०२५ ची यशस्वी सांगता

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** गेल्या 1 महिन्यांपासून सुरू असलेल्या वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग – 2025ची यशस्वी सांगता प्रजासत्ताक दिनी, 26 जानेवारी रोजी उत्साहात झाली. या स्पर्धेत वाघोलीतील महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला, ज्यात तब्बल 52 संघ आणि 600 हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदिप सातव आणि रत्नदिप सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रत्नमाला संदिप सातव यांनी या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते.

15 दिवसांहून अधिक काळ चाललेल्या या स्पर्धेत महिलांनी क्रिकेटचा मनमुराद आनंद घेतला. काही महिलांनी स्वखर्चाने कोच लावून, टर्फ बुक करून रात्री उशिरापर्यंत सराव केला, हा त्यांचा समर्पणभाव आणि उत्साह वाखाणण्याजोगा होता. पार पडलेल्या स्पर्धेत Orchid Storms संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर Mulik Strikers दुसऱ्या क्रमांकावर राहिला. United Blue तिसऱ्या स्थानावर तर Utsav Spratance चौथ्या स्थानावर राहिले. प्रत्येक संघाने दाखवलेला कष्ट, सातत्य, त्याग आणि समर्पण स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

आगामी वाघोली वुमेन्स क्रिकेट लीग – 2026 साठी तयारी आता सुरू करण्याचे आवाहन देखील संदिप सातव यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. पुढच्या वर्षी देखील स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल असं सातव यांनी जाहीर केले आहे.



### महिलांसाठी सुरक्षा क्रमांक जारी

- महिला सुरक्षिततेसाठी 98220 23456 हा हेल्पलाइन नंबर जारी करण्यात आला आहे. वाघोलीतील कोणतीही महिला कोणत्याही अडचणीत असल्यास, कोणतीही मदत पाहिजे असल्यास या क्रमांकावर संपर्क करू शकते. मदत मागणाऱ्या महिलांची गोपनीयता राखली जाईल. हा क्रमांक 365 दिवस, 24 तास सुरू राहणार आहे.

### नागरिकांसाठी लवकरच नवीन उपक्रम

- वाघोलीतील नागरिकांसाठी लवकरच विविध सामाजिक आणि विकासात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे संदिप सातव यांनी सांगितले. तसेच कोणत्याही समस्येसाठी नागरिकांनी माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा थेट मला फोन करून माहिती द्यावी, समस्येवर निश्चित तोडगा काढला जाईल असे आवाहन ही सातव यांनी केले.